फक्त कार्यालयीन उपयोगासाठी

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

# आदिवासी उपयोजना क्षेत्रान्तर्गत फलोद्यान विकास कार्यक्रमावरील मूल्यमापन अहवाल

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य
२८ राणीचा बाग, पुणे – ४११००१.

१९८८

(७२)

फक्त कार्यालयीन उपयोगासाठी

महाराष्ट्र शासन

# आदिवासी उपयोजना क्षेत्रान्तर्गत फलोद्यान विकास कार्यक्रमांवरील मूल्यमापन अहवाल

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य
२८, राणीचा बाग, पुणे-४११००१
१९८८

# प्रस्तावना

महाराष्ट्रात अनेक फळझाडांची विपुलता व विविधता आढळून येते. महाराष्ट्रातील काही फळांनी तर जागतिक बाजारपेठेत मानाचे स्थान मिळविलेले आहे. राज्यातील निरनिराळ्या विभागात ऋतुमानाप्रमाणे फळांची विपुलता व तुटवडा अनुभवास येतो. तथापि राज्यातील नैसर्गिक स्थिती व सिंचनाच्या सोयी पाहता असे दिसून येते की, बहुतांशी जमीन पावसाच्या पाण्यावरच पिकते. परिणामत: पावसाळी पाण्यावर पिकणा-या किंवा कोरडवाहू शेतीवर अवलंबून असणा-या अल्प व सीमांतिक शेतक-यांना शेतीवर स्थैर्य लाभत नाही ही राज्यातील सामान्य शेतीची एक समस्या आहे.

कोरडवाहू क्षेत्रातील शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी फळझाडे लागवड फलदायी ठरू शकेल हे लक्षात घेऊन शासनाने फलोत्पादन विकासाच्या सधन कार्यक्रमाव्दारे अल्प व सीमांतिक शेतकरी व दुर्बल घटकांच्या आर्थिक उत्पन्नात भर घालण्याचे धोरण अवलंबिले आहे. या कार्यक्रमान्तर्गत विविध योजनांची आखणी व अंमलबजावणी करण्याचे कामी नवीन स्वतंत्र फलोद्यान विकास विभागाची स्थापना केली आहे.

आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील डोंगराळ व हलक्या प्रतीची जमीन व त्यावर भर म्हणून सिंचनाच्या सोयीचा अभाव पाहता आदिवासी शेतक-यांना शेती व्यवसाय कमी उत्पन्नाचा ठरला आहे. तेव्हा अल्प भूधारकांचे व दुर्बल घटकांचे जीवनमान उंचावण्यासाठी "फळझाडे लागवड योजना" वरदायिनी आहे म्हणूनच फळझाडे लागवडीच्या अनुदानाधिष्ठित योजना त्या भागात राबविण्यात आल्या आहेत. परंतु फलोद्यान विकासातील आदिवासींचा सहभाग व बहुविध योजनाव्दारे त्यांना झालेला लाभ याचे प्रमाण अजमाविणे काळाच्या ओघात क्रमप्राप्त झाले आहे. त्यासाठी या संस्थेचे फलोद्यान विकास कार्यक्रमांची क्षेत्रीय पाहणी करून एक मूल्यमापन अहवाल तयार केलेला आहे.

सदर क्षेत्रीय व मूल्यमापन पाहणीचे काम मा. वि. स. महाजन, सांख्यिकी अधिकारी यांचेकडे सोपविण्यात आलेले होते. तसेच अहवालांच्या प्रारुप लेखनाचे काम देखिल त्यांनी मा. ग. भा. सुराणा उपसंचालक यांचे देखरेखीखाली व माझे मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

सदर मूल्यमापन पाहणी अहवाल पत्नीधान विकास योजनांची आखणी व अंमलबजावणी करणारे अधिकारी वर्ग, आदिवासी विकास योजनामध्ये रस घेणारे अधिकारी यांना उपयोगी पडेल अशी अपेक्षा आहे.

[डॉ. गोविंद गारे]
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

# - अनुक्रमणिका -


| अनुक्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| [१] प्रकरण [१] | प्रास्ताविक माहिती | १ | ५ |
| [२] प्रकरण [२] | मूल्यमापन अभ्यासाचा उद्देश व सर्वेक्षण पध्दती. | ६ | ९ |
| [३] प्रकरण [३] | सातव्या पंचवार्षिक योजनेंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रातील फलोद्यान विकास कार्यक्रमाचे स्वरुप. | १० | २० |
| [४] प्रकरण [४] | क्षेत्रीय पाहणी अहवालाचा गोषवारा | २१ | ३६ |
| [५] प्रकरण [५] | सर्वसाधारण निरीक्षण व निष्कर्ष | ३७ | ४२ |
| [६] प्रकरण [६] | सुचना तथा शिफारसी | ४३ | ४८ |
| [७] परिशिष्ट [१] | प्रपत्र [१] लाभधारकाची माहिती | १ | ५ |
| [८] परिशिष्ट [२] | प्रपत्र [२] योजना राबविणाऱ्या यंत्रणेसाठी. | ६ | ७ |

## प्रकरण १ ले

## प्रास्ताविक माहिती

१.१ प्राचीन काळापासून आपल्या देशात फळझाडांची लागवड होत आहे. त्यामुळे विविध फळांची रेलचेल आपल्या दृष्टोत्पत्तीस येते. नाना प्रकारची फळे या भूमीमध्ये बहरतात म्हणून महाराष्ट्रामध्ये फळझाडांची विपुलता व विविधता आढळते. जगप्रसिध्द हापूस आंबा कोकण भागात अमाप पिकतो व परकीय चलन मिळवून देतो. नाशिकची द्राक्षे, खानदेशाची बोरे, दौलताबादची सिताफळे, नागपूरची संत्री, घोलवडचे चिक्कू तर भुसावळची केळी सर्वत्र सुप्रसिध्द आहेतच. महाराष्ट्रातील कोकण भूमीला तर फळझाडांचे वरदान लाभले आहे. तेथे आंबा, अननस, नारळ, काजू व कोकम विपुल प्रमाणात पिकतात. याशिवाय मसाल्याच्या पिकाची नवीन लागवड आता किफायतशीर होऊ लागली आहे. राज्यातील विदर्भ भागात, तर मोठया प्रमाणावर संत्री उत्पादनाचे मोठमोठे शेती प्रकल्प हाती घेतले आहेत.

१.२ राज्याच्या हवामान, पर्जन्य व भौगोलिक स्थितीचा विचार करता आपल्या राज्यात सिंचनाखालील क्षेत्र केवळ १३ टक्के इतके आहे. यापैकी आदिवासी क्षेत्रात तर हे प्रमाण फार कमी म्हणजे ५ ते ८ टक्के किंवा त्याहूनही कमीच आहे. त्यामुळे उरलेले जवळपास ८७ टक्के क्षेत्र हे पावसाच्या पाण्यावर अवलंबून अगर कोरडवाहू आहे. ह्या क्षेत्रातील पाऊस अत्यंत अनियमित असल्याने तेथे होणा-या धान्यपिकांचे उत्पन्न मेहनत करूनही हमखास चांगले येईल याची खात्री नसते. त्यामुळे पावसाळी अन् कोरडवाहू भागातील शेतक-यांना त्यांच्या शेतीवर स्थैर्य लाभत नाही. साधारणत: राज्यातील शेतीची ही प्रमुख समस्या आहे.

१.३ कमी पाणी उपलब्ध असलेल्या अथवा कोरडवाहू क्षेत्रातील शेतक-यांच्या आर्थिक उन्नतीसाठी कोरडवाहू फळझाडांच्या लागवडीचा कार्यक्रम फलदायी ठरू शकतो असे अनेक प्रयोगांती व अनुभवाने सिध्द झाले आहे. याहीपेक्षा अत्यंत महत्वाची बाब म्हणजे पर्यावरण संतुलनाच्या कामी फळझाडे सहाय्यभूत ठरतात असा अनुभव आहे. ज्या प्रदेशातील जमिनीवर वनस्पतीचे हिरवे आवरण मोठया प्रमाणावर असेल तेथे ढगातील

पाउस जमिनीवर पडण्यास मदत होते. त्याशिवाय अवर्षणग्रस्त अथवा टंचाईग्रस्त भागात दुष्काळावर मात करण्यासाठी फळझाडांची लागवड ही मोलाची कामगिरी बजावू शकते.

१.४ महाराष्ट्रात फलोत्पादन विकासास असलेला वाव आणि उपलब्ध लागवडीलायक क्षेत्राचा अधिकाधिक योग्य वापर करुन फलोत्पादनाव्दारे लहान व सीमांतिक शेतकरी व दुर्बल घटक यांचे आर्थिक उत्पन्नात भर घालण्याच्या उद्देशाने व फलोत्पादनाचे क्षेत्र वाढविण्याच्या उदात्त हेतूने शासनाने सन १९८२-८३ पासून "फलोत्पादन विकास कार्यक्रम" राज्यातील सर्व जिल्हयांना लागू केला आहे.

१.५ फलोत्पादन विकासाच्या विविध योजनांची आखणी व अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यामध्ये शेती व सहकार खात्यामार्फत करण्यात येते. फलोत्पादन विकासाच्या विविध योजनांची अंमलबजावणी नीट व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र फलोत्पादन संचालनालय स्थापन करण्यात आले आहे. या संचालनालयाच्या अधिपत्याखाली प्रत्येक विभागासाठी, अधिक्षक फलोत्पादन अधिकारी व जिल्हा पातळीवर उपसंचालकांचे कार्यालय आहे. उपसंचालकांचे मदतीसाठी सहकार व सांखियकी विभागातील तज्ञ अधिकारी नेमण्यात आले आहेत. तालुका पातळीवर रोपवाटिकेसाठी एक फलोधान अधिकारी व किमान एक माळी कर्मचारीवृंद नेमण्यात आला आहे. अशाप्रकारे फळबागा विकासाच्या व फुलझाड लागवडीच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. शेतक-यांशी संपर्क साधून, फलोधान विकास योजना राबविण्यासाठी फळबाग लागवडीचे महत्व पटवून देणे, झाडांना कलमे करणे/डोळा भरणे, शेतक-यांना बँकामार्फत कर्जपुरवठा करणे, भांडवली अनुदान योजना राबविणे, रोप मळ्यातून रोपांचा/कलमांचा पुरवठा करणे इत्यादी कामे व याबाबत सर्व सहकार्य या खात्याकडून देण्यात येते.

१.६ आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जमिनीचा विचार केला असता असे आढळून येते की, आदिवासींची शेतजमीन डोंगर उतारावर

व हलक्या प्रतीची आहे. केवळ ती पर्जन्यात व हलक्या स्वरूपात क्वचितच आढळते. याशिवाय वरकस व कोरडवाहू जमिनीस सिंचन सोयींचाही अभाव आढळतो. परिणामत: आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जमिनीचा प्रकार व पोत तसेच सिंचनाच्या सुविधांचा अभाव यांचा साकल्याने विचार करता आदिवासींच्या शेतजमिनीत पिकांचे उत्पादन वाढणे फारच जिकिरीचे व अशक्यप्राय होऊन गेले आहे. त्यामुळे आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अल्प व सिमांतीक शेतक-यांना शेती किफायतशीर होण्याच्या दृष्टीने फळझाडे लागवडीची योजना शासनाने मोठ्या प्रमाणात राबविण्याचे ठरविले आहे.

१.७ फळझाडे लागवडीचे आदिवासी विभागात विशेष महत्व आहे. आदिवासींची डोंगर उताऱावरील शेती, जमिनीचे लहान लहान तुकडे, शेतीसाठी पाण्याचा अभाव, आदिवासी शेतक-यांची हलाखीची आर्थिक स्थिती व शैक्षणिक मागासलेपणा या बाबींचा विचार करता त्या क्षेत्रात फळझाडे लागवडीचे महत्वाचे आर्थिक, औद्योगिक व नैसर्गिक फायदे खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेत.

१] अन्नधान्य व कडधान्य पिकणा-या तेवढ्याच क्षेत्रात फळझाडांच्या लागवडीपासून जास्त उत्पन्न मिळू शकते.
२] काही फळझाडे योग्य हवामान व जमीन लाभल्यास नगदी पिकांपेक्षा अधिक उत्पन्न मिळवून देतात.
३] फलोद्यानामुळे शेतक-यांना बाराही महिने कामधंदा मिळू शकतो.
४] फळझाडांच्या लागवडीमुळे आदिवासींच्या डोंगर उतारावरील शेताची पावसामुळे होणारी धूप थांबविण्यास मदत होते.
५] झाडांच्या लागवडीमुळे पावसाचे प्रमाण वाढून निसर्गातील पर्यावरण समतोल राखण्यास मदत होते.
६] मानवी आहारात फळांचे अनन्य साधारण महत्व आहे. विविध जीवनसत्वांचा पुरवठा करणा-या फळांचे अत्यंत महत्व आहे. आदिवासींच्या आहारामध्ये इतर अन्नधान्याच्या बरोबरीने फलहाराचा समावेश सहजगत्या होतो.

७) फळझाडांच्या उत्पादनावर आधारित काही पूरक उद्योगधंदे भागात भागात सुरु करता येतात.

१.८ थोडक्यात असे म्हणता येईल की, आदिवासी अर्थव्यवस्थेमध्ये फलोद्यानास एक आगळे स्थान आहे. आतापर्यंत आदिवासी केवळ फळं गोळा करणारा, जंगल गौण जिन्नस गोळा करणारा म्हणून ओळखला गेलेला आहे. ही परिस्थिती पालटायला हवी व हळूहळू आदिवासीला झाडे-रोपवाटिका फुलविणारा "किमयागार" बनवायला पाहिजे. आदिवासी भागात जमीन विस्तृत परंतु डोंगर उतारावरची आहे. काही ठिकाणी जमिनीची धूप तर अत्यंत थिरगेला पोहोचलेली आहे. परिणामत: जमिनीला झाडाचे संरक्षण नामशेष होत चालले आहे. तथापि, तेथील हवामानाची स्थिती फळझाडांच्या पीकासाठी अतिशय उपयुक्त आहे. फळझाडांची लागवड व त्यांची निगा हे आदिवासींना आवडणारे एक काम आहे. एवढेच नाहीतर त्यांच्या परंपरागत राहणीशी ते मिळते-जुळते आहे. म्हणूनच फलोद्यान विकासाचा सघन कार्यक्रम आदिवासी क्षेत्रात हाती घेण्यास भरपूर वाव आहे. असा सघन फलोत्पादनाचा कार्यक्रम हाती घेतल्यास राज्यातील या प्रदेशाला फलोत्पादनाच्या मोठ्या प्रमाणावरील आर्थिक उलाढालीचे स्वरुप प्राप्त होईल. म्हणून आदिवासी क्षेत्राचा भौगोलिक, सामाजिक व आर्थिक स्थितीचा मागोवा घेता राज्यातील विशेषत: पावसाळी व कोरडवाहू क्षेत्रासाठी फळबागा लागवडीचे, संवर्धनाचे/संगोपनाचे नवे तंत्रज्ञान विकसित करुन त्याचा प्रत्यक्ष वापर करणे आवश्यक आहे. त्याकरिता सध्याची पिके व फळझाडे ह्यांची "मिश्रशेती" पध्दती रुजविणे जरुरीचे आहे. या प्रयोगातूनच महाराष्ट्रातील शेतक-यांना शेतीत स्थैर्य लाभेल. म्हणूनच शासनाने आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अल्प व सीमांतिक शेतक-यांसाठी व दुर्बल घटकांसाठी फलोत्पादन विकासाच्या भांडवली व अनुदान स्वरुपातील विविध योजना तयार करुन अंमलबजावणी केली आहे. परंतु या योजनांव्दारे आदिवासी शेतक-यांना कितपत व कसा फायदा होत आहे हे पाहणे अगत्याचे झाले आहे, फळबागांच्या योजनामधून आदिवासी शेतक-यांना

आर्थिक स्थितीमध्ये काय बदल घडला आहे, योजनेचे स्वरूप त्यांच्या परिस्थितीशी, कायद्याशी निगडीत आहे किंवा नाही याचा आढावा घेणे निकडीचे वाटते. फलोद्यान विकास योजनांच्या अंमलबजावणीमध्ये काही सदोषता आहे किंवा कसे याचा अभ्यास-पाहणी करणे व तेथीच सुधारणा घडवून आणण्यासाठी मूल्यमापन अभ्यास होणे जरूरीचे वाटते. ह्यासाठी क्षेत्रीय पाहणीतून मूल्यमापन अहवाल तयार करण्याचे काम या संस्थेने हाती घेतले आहे.

.....

## प्रकरण २ रे

## मूल्यमापन अभ्यासाचा उद्देश व सर्वेक्षण पध्दती

२.१ फलोद्यान विकास विभागामार्फत फलोद्यान विकासाच्या अनेकविध योजनांची अंमलबजावणी आदिवासी क्षेत्रात केली जात आहे. आदिवासींच्या आर्थिक उत्पन्नामध्ये भर घालण्याच्या उद्देशाने व फलोत्पादनाखालील क्षेत्र वाढविण्याच्या हेतूने फलोत्पादनाच्या विविध योजना आखण्यात आल्या आहेत. सदर योजनाचा लाभ प्रामुख्याने अल्प व सीमांतिक भूधारकांना देण्यात येतो. परंतु या कार्यक्रमाव्दारे योजलेले फायदे आदिवासी शेतक-यांना योग्य प्रमाणात मिळतात किंवा कसे ? योजनेच्या आखणी व अंमलबजावणीमध्ये काही त्रुटी अगर दोष आढळतात काय ? काही योजनांच्या स्वरुपात मूलभूत बदल करणे इष्ट होईल काय ? इत्यादी प्रश्नांची तोडफणूक करण्यासाठी मूल्यमापन पाहणीमध्ये खालील उद्देश डोळ्यापुढे ठेवण्यात आले आहेत.

१] फलोद्यान विकासाच्या योजनांमध्ये आदिवासींचा सहभाग व प्रतिसाद आजमाविणे.

२. आदिवासी लाभार्थींना योजनेचा किती प्रमाणात लाभ झाला ते पहाणे.

३. आदिवासी लोकांच्या फायद्यासाठी सदर योजनेत काही फेरफार करणे आवश्यक आहेत काय ?

४. योजना राबविताना अधिकारी वर्गास येणा-या अडीअडचणींचा शोध घेणे.

५. योजनेमधील दोष, त्रुटी/दिग्दर्शित करणे व सुधारणेसाठी सूचना करणे.

६. फळबाग लागवडीच्या योजनेसंबंधी आदिवासी लोकांत जागृती निर्माण करण्यासाठी काही उपाययोजना सुचविणे.

७. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जमीन, हवामान व पाण्याची सोय व लोकांचा कल अजमावून नवीन योजना सुचविणे व त्या राबविण्यासंबंधी शिफारशी करणे.

२.२ सर्वेक्षणावरील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी लागणाऱ्या फलोधान विकास विभागाकडून माहिती गोळा करण्यात आली. सन १९८६-८७ व १९८७-८८ ही आधारभूत वर्षे मानून आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सर्व जिल्हयांची फलोधान विकास योजनेसंबंधीची माहिती गोळा करण्याचे निश्चित करण्यात आले. या सांख्यिकी माहितीच्या आधारे व संस्थेकडील सर्वेक्षणाच्या कामी उपलब्ध होणारा कर्मचारीवृंद तसेच सर्वेक्षणासाठी लागणारा कालावधी विचारात घेऊन ठराविक क्षेत्रातच सर्वेक्षण करण्याचे ठरविण्यात आले. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सहयाद्रि विभागातून एक तर गोंडवन विभागातून एक अशा दोन जिल्हयांची त्यासाठी निवड करण्यात आली. ज्या जिल्हयामध्ये अधिकाधिक फलोत्पादनाच्या योजना राबविण्यात आलेल्या आहेत त्यांचा प्राधान्याने या पाहणीत समावेश करण्याचे ठरले. त्याचबरोबर लाभार्थींची संख्या विचारात घेऊन अधिकाधिक लाभार्थींची संख्या असलेल्या जिल्हयांची निवड कायम करण्यात आली. त्या निकषानुसार सहयाद्रि विभागातून ठाणे जिल्हा तर गोंडवन विभागातून यवतमाळ जिल्हा पाहणीसाठी निवडण्यांत आला.

२.३ प्रत्येक जिल्हयातून दोन तालुके निवडण्याचे ठरले. सदर तालुक्यांची निवड करतांना ज्या तालुक्यात अधिकाधिक योजना राबविल्या गेल्या आहेत , त्याचाच प्रामुख्याने विचार करण्याचे ठरले. उपसंचालक, फलोधान विकास विभाग यांचेकडील सांख्यिकी माहितीवरून व त्यांच्याशी चर्चा करून दोन तालुक्यांची क्षेत्रीय पाहणीसाठी निवड केली. त्याप्रमाणे सहयाद्रि विभागातील ठाणे जिल्हयातून डहाणू व जव्हार हे विकासगट/तालुके निवडले तर गोंडवन विभागातील यवतमाळ जिल्हयातून पुसद व उमरखेड या तालुक्यांची निवड करण्यात आली.

२.४ गावांच्या निवडीसंबंधी काही निकष ठरविण्यात आले. फलोधान योजनेचा जास्त फायदा देण्यात आलेली गावे, त्यात रस्त्यालगतची व दुर्गम भागातील गावे यांचा समावेश करण्याचे ठरले. त्यानुसार रस्त्यावरील एक गांव, रस्त्यापासून थोडयाशा अंतरावरील एक गांव

दुर्गम भागातील एक गांव असा तीन गावांची निवड एका तालुक्यातून करण्याचे ठरले. सर्व योजनांचा व वर्गवारीचे लाभार्थींचा समावेश व्हावा म्हणून गावातून किमान २५ व कमाल ३० लाभार्थींची निवड करण्याचे ठरविले. अशाप्रकारे दोन जिल्ह्यातील चार तालुक्यातून कमाल १२० लाभार्थींची प्रत्यक्ष भेटीव्दारे माहिती संकलित करण्याचे ठरविण्यात आले.

२.५ निवड केलेल्या लाभार्थींची माहिती गोळा करण्यासाठी एक प्रश्नावली/प्रपत्र [ *Schedule*] तयार करण्यांत आले. तसेच योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे योजनेसंबंधीचे अभिप्राय नोंदविण्यासाठी एक प्रपत्र तयार करण्यात आले. ही दोन्ही प्रपत्रांची मुख्य पाहणी हाती घेण्यापूर्वी पूर्व-चाचणीव्दारे तपासणी करण्यात आली. क्षेत्रीय पाहणीसाठी योजलेली प्रपत्रे यासोबत माहितीसाठी जोडली आहेत.

सारांश जिल्हा/तालुका/गांव/व लाभार्थी निवडीचे स्वरुप खालील तक्त्याव्दारे दिग्दर्शित करता येईल.

तक्ता क्र. १

जिल्हानिहाय तालुके/गांव/लाभार्थी निवड

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | निवडलेल्या गावांची संख्या | निवडलेल्या लाभार्थींची संख्या. |
|---|---|---|---|---|
| १. | ठाणे | १. डहाणू | ३ | ३० |
| | | २. वाडा | ९ | ३० |
| २. | यवतमाळ | ३. पुसद | ३ | ३० |
| | | ४. उमरखेड | ३ | ३० |
| | एकूण- | ४ | १८ | १२० |

सर्वेक्षण पाहणीतील १२० मागासवर्गीयांकडून मिळविलेल्या माहितीचे तक्तीकरण व पृथ:करण करण्यात आले. त्यातून निघालेल्या निष्कर्षांचा सांगोपांग विचार पुढील प्रकरणात करण्यात आला आहे. तसेच योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांच्याही विचारांची सांगड शिफारस प्रकरणात व इतर प्रकरणात योग्य ठिकाणी करण्यात आली आहे. यासंबंधी काही ग्रामस्थांबरोबर केलेल्या महत्वाच्या चर्चेचा व त्यांच्या अनुभवांचा आढावा घटना अभ्यास *(Case Studies)* मध्ये करण्यात आला. या पाहणीतील निष्कर्ष, शिफारसी क्षेत्रीय पाहणीवरच मुख्यत्वे आधारलेल्या आहेत.

.....

## प्रकरण ३ रे

## सातव्या पंचवार्षिक योजनेंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रातील फलोद्यान विकास कार्यक्रमाचे स्वरूप

प्रस्तावना :

३.१ आदिवासी शेतक-यांच्या जीवनाला समृध्दी आणण्यासाठी फळझाडे, इंधनासाठी लागणारे लाकूड उपलब्ध करून देणारे वृक्षवल्ली इमारतीसाठी लाकूड पुरविणारी झाडे, औषधी व सुगंधी द्रव्ये देणा-या वनस्पती, भाजीपाला व मसाल्याची पिके यांची शेती वाढविणे हे शासनाचे धोरण आहे. त्यास अनुसरून फलोत्पादन विकासासाठी शासनाने अनेकविध योजना मंजूर केल्या आहेत. त्यामध्ये फळ लागवडीखाली नवीन क्षेत्र आणणे, सध्या अस्तित्वात असलेल्या फळबागांचे पुनरूज्जीवन करणे, कमी प्रतीच्या अथवा गावठी फळबागांचे रूपांतर उच्च प्रतीच्या पण अधिक उत्पन्न व चांगला स्वाद देणा-या फळझाडांमध्ये करणे. शेतक-यांची फळझाडे रोपे/कलमे यांची वाढती मागणी पुरविण्यासाठी रोपे/कलमांचे रोप-मळ्यातून उत्पादन करणे. त्याचबरोबर शेतक-यांना तांत्रिक सल्ला देणे अशा योजनांचा समावेश आहे. राज्याच्या आदिवासी उपयोजना क्षेत्रात कार्यवाही होत असलेल्या योजनांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे नमूद करता येईल.

[१] अल्पभूधारकांसाठी भांडवली अनुदान योजना :

अल्प व सीमांतिक आदिवासी शेतक-यांकडे पुरेशी भांडवल तरतूद नसल्याने ते फलोत्पादन योजनेपासून वंचित राहात. अल्प-भू-धारकांना शेती पिकांव्यतिरिक्त उत्पान्नाचे जोड साधन मिळावे म्हणून अल्प-भू-धारक व छोट्या शेतक-यांना फळबाग लागवडीला उत्तेजन देण्यासाठी भांडवली अनुदानाची योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण कृषि विकास बँकेने [नाबार्ड] अल्प-भूधारक शेतक-यांची व्याख्या ठरविताना जमीन धारणेची मर्यादा शिथिल केली आहे. अल्प व सीमांतिक खातेदारांची जमीन १७.२५

एकर [६.९० हे.] पेक्षा जास्त [illegible] लावण्यासाठी शेतक-यांना भू-विकास बँक व राष्ट्रीयकृत बँकांकडून दीर्घ मुदतीचे कर्ज देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सुमारे १५ वर्षे मुदतीचे ह्या कर्जाची परतफेड फलधारणेनंतर पाच ते सात वर्षांत करावी लागते. तसेच अल्प-भू-धारकांकरिता कर्जाचा बोजा हलका व्हावा म्हणून $33\frac{1}{3}$ टक्के अनुदान दिले जाते. [illegible] आंब्याच्या लागवडीस ५० टक्के इतके अनुदान देण्यात येते. [illegible] यांनी दरवर्षी किती व कशाप्रकारे टप्पाटप्प्याने अर्थसहाय्य करावे याचा तपशील निर्धारित करण्यात आला आहे.

[२] <u>दुर्बल घटकांच्या घराभोवती फळझाडे</u> [घरकुल योजना] :

या योजनेखाली फलोद्यान विकास कार्यक्रमासाठी शासनाने ग्रामीण भागात बांधून दिलेल्या घरकुलातील आदिवासी कुटुंबांना त्यांच्या घराभोवती लावण्यासाठी शंभर टक्के अनुदानावर प्रत्येकी पाच फळझाडांची रोपे/कलमे रोपवाटिकेतून दिली जातात.

[३] <u>गावठी आंबा व बोर झाडांचे सुधारित जातीत रूपांतर</u> :

या योजनेखाली आदिवासी शेतकऱ्यांच्या स्वत:च्या मालकीच्या गावठी आंबा किंवा बोर झाडावर पाचर कलम अथवा डोळा भरून त्यांचे सुधारलेल्या जातीत रूपांतर करता येते. याशिवाय ज्या अल्प-भूधारकांनी स्वत:च्या खर्चाने आपल्या मालकीच्या आंबा व बोर झाडांचे रूपांतर करून घेतले असेल त्यांना प्रत्येक यशस्वी झाडामागे आंब्यास रु. ४/- व बोर झाडास रु. ३/- प्रमाणे अनुदान देण्याची व्यवस्था केली आहे. मात्र यासाठी फलोद्यान विभागास पूर्व सूचना देणे जरूरीचे आहे.

तसेच स्थानिक संस्था म्हणजे ग्रामपंचायत आपल्या हद्दीत किमान ५०० झाडे [आंबा, बोर मिळून] सुधारित जातीमध्ये रूपांतरित करून जगवून दाखवतील अशा संस्थांपैकी पहिल्या दोन क्रमांकाच्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहनासाठी अनुक्रमे रु. ३०००/- व रु. २०००/- ची रोख बक्षिसे शासनाने ठेवली आहेत.

[४] <u>जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन</u> :-

जुन्या फळबागापासून मिळणाऱ्या उत्पादनात घट होत असल्याने अशा जुन्या फळबागांचे उत्पादन वाढविण्यासाठी सुधारित मशागत पध्दतीचा अवलंब करुन उत्पादन वाढविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

उत्पादन घटलेल्या शेतकऱ्यांच्या बागांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी निवड करावयाची असून पुनरुज्जीवनाचा खर्च सदर शेतकऱ्याने स्वत: करावयाचा आहे. लहान व जनजाती शेतकऱ्यांना बागांच्या पुनरुज्जीवनासाठी होणाऱ्या खर्चाचा भार कमी व्हावा म्हणून खर्चाच्या ५० टक्के किंवा दर हेक्टरी कमाल रु.१०००/- पर्यंत अर्थसहाय्य करण्यात येते. इतर शेतकऱ्यांना खर्चाच्या २५ टक्के परंतु हेक्टरी जास्तीत रु.५००/- पर्यंत अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेचे वैशिष्टय असे की, सतत तीन वर्षे त्याच प्रक्षेत्रावर ही योजना राबवून उत्पादनात वाढ झाली किंवा कसे याची नोंद घेउन ठरविण्यात येते.

[५] <u>भाजीपाला विकास योजना</u> :

आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या दैनंदिन आहारात भाजीपाल्याचा वापर सुलभ व्हावा व गरज भागवून उरलेला भाजीपाला उत्पादन जवळच्या बाजारपेठेत विकून आर्थिक लाभ मिळविता यावा हा या योजनेमागील उद्देश आहे.

सदर योजनेंतर्गत, लहान सिमांतिक व आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या ०.१० हेक्टर क्षेत्रावर भाजीपाल्याची लागवड करण्यासाठी सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते व कीटक नाशके यांच्या निविष्टा [मिनीकिटस] विनामूल्य [मोफत] पुरविल्या जातात. सदर निविष्टांची किंमत रु.१९०/- असून भाजीपाला लागवडीकरिता उत्तेजन मिळावे यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे.

[६] पुष्प-संवर्धन योजना :-

भारतीय संस्कृतीमध्ये धार्मिक सण व समारंभ, सजावट इ. प्रसंगी फुलांना अनन्य साधारण महत्व आहे. फुलझाडाखालील क्षेत्र वाढवून फुलांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने लहान व सीमांतिक शेतक-यांना फुलांचे बी व पीक संरक्षक औषधे निविष्टा [मिनीकीटस्] वाटण्यात येतात. सदर निविष्टांची किंमत सुमारे रु. ७५/- असते. परंतु आदिवासी शेतक-यांना निविष्टा ५० टक्के अनुदानावर तर सर्वसाधारण शेतक-यांना ३३$\frac{1}{3}$ टक्के अनुदानावर उपलब्ध करून देण्यात येतात.

[७] पीक संरक्षक योजना :-

संत्री पिकांचे कोळशी रोगापासून संरक्षण किंवा निर्मूलन करण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत ५० टक्के अनुदानावर कीटकनाशके शेतक-यांना पुरविण्यात येतात. औषधासाठी वाटप प्रत्येक पंचायत समितीमार्फत करण्यात येते.

[८] ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजना :

उपलब्ध सिंचन सोयींचा अपुरेपणा विचारात घेता असलेल्या जमिनीचा जास्तीत जास्त वापर व्हावा या उद्देशाने ग्रामीण भूमीहिन रोजगार हमी योजनेच्या निधीतून अनुसूचित जाती/जमाती व दारिद्र्य रेषेखालील सर्वसाधारण शेतक-यांकडील तसेच सामुदायिक क्षेत्रातील जमिनीची निवड करुन फळबाग लागवडीचा कार्यक्रम राबविला जातो. भूमिहीन कुटुंबातील मजुरांना कायमस्वरुपाचा रोजगार उपलब्ध व्हावा हा या योजनेमागील प्रमुख हेतू आहे. ही योजना केंद्र पुरस्कृत असून, राज्य शासनाने चार वर्षाकरिता कार्यान्वित केली आहे.

सदर योजनेंतर्गत दर हेक्टरी १०० फळझाडे व १५०० चारा/इंधन झाडे लावून संवर्धन करावयाची आहेत.

(९) रोपवाटिकांमधून रोपे/कलमांचे संवर्धन :-

फलोद्यान विकास योजनांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना तसेच इतर मध्यम बागायत/जिरायत शेतकऱ्यांना उत्कृष्ट दर्जाची रोपे व कलमे योग्य दरात उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने शासनाने जिल्हा स्तरावर एक जिल्हा मध्यवर्ती फळरोपवाटिका स्थापन केल्या आहेत. प्रत्येक फळरोपवाटिकेत चांगल्या प्रतीची, खात्रीशीर आणि जातीवंत मातृवृक्षांची लागवड करण्यात आली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने आंबा, नारळ, चिकू, संत्री, मोसंबी, कागदी लिंबू, डाळिंब, सिताफळ, अंजीर, बोर, चिंच, सिडले सलेमन अशा फळझाडांचा समावेश आहे.

मातृवृक्ष लागवडी बरोबरच फळरोपवाटिकेत कलमे/रोपे यांच्या उत्पादनाचा कार्यक्रमही गेल्या तीन वर्षापासून राबविण्यात येत आहे.

७ वी पंचवार्षिक योजना व फलोद्यान विकास कार्यक्रम

३.२ राज्यामध्ये फलोत्पादन विकासाला भरपूर वाव आहे. म्हणून सन १९८२-८३ सालापासून वित्तीय संस्थांच्या मदतीने शासनाने फलोद्यान विकासाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. फलोत्पादन विकासात फळबागा, भाजीपाला, मसाला, पिके इ. वाढ व विकास यांचा समावेश आहे. राज्यामध्ये सध्या ४.८० लक्ष हेक्टर क्षेत्र फलोद्यान विकासाखाली आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत लहान व सीमांतिक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यास अशा पूरक उद्योगधंद्यांची मदत होते. म्हणून ७ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये राज्यातील उपयोजना क्षेत्रातील १.१५ लक्ष हेक्टर जमीन लागवडीखाली आणण्यासाठी ३१९६ लक्ष रुपयांच्या व्ययाची तरतूद करण्यात आली आहे. ओसाड व नापीक माळरान जमीन क्षेत्र फळबाग लागवडीखाली आणण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत.

३.२ आदिवासी उपयोजना क्षेत्रात धारकांना रोपे/कलमे इ. लागवडीचे साहित्य पुरविणे, कीटकांचा नाश करणे, लहान व सीमांतिक शेतक-यांच्या मळ्यात फळबागा लागवडीस प्रोत्साहन देणे व मोठया प्रमाणावर कार्यक्रम राबविणे इ. कार्यक्रमांतर्गत ७ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात पुरेशी तरतूद केलेली आहे. फलोधान विकास कार्यक्रमाखाली राज्यस्तरीय व आदिवासी उपयोजनेमध्ये करण्यात आलेली आर्थिक तरतूद व सन १९८५-८६ ते ८७-८८ मधील योजनानिहाय खर्च तक्ता क्र. ३.१ मध्ये दर्शविला आहे.

<u>तक्ता क्र. ३.१</u>

<u>राज्य व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत फलोधान विकासासाठी तरतूद.</u>

[रु. लाखात]

| अनु. क्र. | बाब | तरतूद राज्य | तरतूद आदिवासी उपयोजना क्षेत्र. | उपयोजना क्षेत्रातील तरतूदीचे राज्य तरतूदीशी प्रमाण. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | सातवी पंचवार्षिक योजना. | ३१९६ | ४४६.१६ | १३.९५ |
| २. | वार्षिक योजना | | | |
| | अ] १९८५-८६ | ६३३ | ५०.६४ | ८.०० |
| | ब] १९८६-८७ | ४९० | ४४.९१ | ९.०० |
| | क] १९८७-८८ | ५३९ | १७७.२८ | ३३.०० |

३.४. वरील तक्त्यातील माहितीचे विश्लेषण करता असे लक्षांत येते की, ७ व्या पंचवार्षिक योजनेत फलोधान विकास कार्यक्रम आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यासाठी राज्याच्या सदर कार्यक्रमाखालील एकूण तरतूदीपैकी १४ टक्के इतकी आहे. वार्षिक योजनेतील तरतूद सन १९८५-८६ मध्ये ८ टक्के, १९८६-८७ मध्ये

९ टक्के इतकी तर सन १९८७-८८ मध्ये ३३ टक्के इतकी होती. यावरून असे अनुमान काढता येईल की, फलोद्यान विकास कार्यक्रम भरघोस राबविण्यासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्राकरिता भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली होती. वर्षनिहाय तरतूदीची तुलना करता सन १९८७-८८ मध्ये आर्थिक तरतूद त्या पूर्वीच्या वर्षापेक्षा चार पटीनी वाढविण्यात आली होती.

३.५ फलोद्यान विकास कार्यक्रमाखालील आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये वार्षिक योजनेंतर्गत म्हणजे सन १९८५-८६, १९८६-८७ व सन १९८७-८८ केलेल्या तरतूदी व खर्चाचा आढावा घेतल्यास खर्च व तरतूदीमधील संबंधाचा उलगडा होईल. त्यासाठी वर्षनिहाय तरतूद व खर्च व त्याचे तरतूदीशी प्रमाण खाली दर्शविलेल्या तक्त्यात नमूद केले आहे.

<u>तक्ता क्र. ३.२</u>

<u>आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत फलोत्पादन विकासावरील वर्षनिहाय तरतूद व खर्च.</u>

[रु. लाखात]

| अनु. क्र. | बाब | तरतूद | खर्च | खर्चाचे तरतूदीशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | ७ वी पंचवार्षिक योजना | ४४६.१६ | - | - |
| २. | वार्षिक योजना | | | |
| | अ] १९८५-८६ | ५०.६४ | १७.०८ | ३४.० |
| | ब] १९८६-८७ | ४४.९१ | २६.०२ | ५९.० |
| | क] १९८७-८८ | १७७.२८ | ५९.०० | ३४.० |
| | एकूण- | २७२.८३ | १०२.१० | ३७.५ |

३.६ तीन वर्षातील खर्चाच्या आलेखावरून हे स्पष्ट होईल की, तरतुदीच्या मानाने प्रतिवर्षी खर्च फारच कमी झालेला आहे. म्हणजेच फलोद्यान कार्यक्रमात कुठेतरी अडचणी असणे संभवते. त्यात योजनांचा अपुरेपणा, प्रशासन यंत्रणा, तांत्रिक अडचणी व योजना घेणाऱ्यांचा प्रतिसाद या बाबींचा समावेश असणे स्वाभाविक आहे.

३.७ पुढील तक्त्यांत केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत फलोद्यान विकास कार्यक्रमाचा वर्षनिहाय खर्चाचा आढावा दिला आहे.

तक्ता क्र. ३.३

राज्यातील केंद्रीय पुरस्कृत योजनांतर्गत फलोद्यान विकास कार्यक्रमावरील वर्षनिहाय खर्च.

[रु. लाखात]

| अनु. क्र. | बाब | तरतूद | प्रत्यक्ष खर्च | अपेक्षित खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | ७ वी पंचवार्षिक योजना. | १५५.०० | | | |
| २. | वार्षिक योजना | | | | |
| | १. १९८५-८६ | | १८.८० | - | १८.८० |
| | २. १९८६-८७ | | ३०.५८ | - | ३०.५८ |
| | ३. १९८७-८८ | | - | १८८.०८ | १८८.०८ |
| | एकूण | | ४९.३८ | १८८.०८ | २३७.४६ |

३.८ आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये राबविलेल्या प्रमुख योजनावरील तरतूद व खर्च अभ्यासणे जरूरीचे वाटते. त्याकरिता खालील तक्त्यात योजनानिहाय व सन १९८६-८७, १९८७-८८ अशी वर्षनिहाय करण्यात आलेली तरतूद व झालेल्या खर्चाची मांडणी करण्यात आली आहे.

तक्ता क्र. ३.४

फलोत्पादन कार्यक्रमांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रात योजना-निहाय तरतूद व खर्च सन १९८६-८७ व ८७-८८

[रु. लाखात]

| अ. क्र. | योजनेचे नांव | १९८६-८७ | | | १९८७-८८ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तरतूद | खर्च | शेकडा प्रमाण | तरतूद | खर्च | शेकडा प्रमाण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | आंबवली अनुदान योजना. | ५.५० | २.४७ | ४५ | १५.०० | १५.०० | १००.० |
| २. | घरकुल योजना [घराभोवती फळबाग लागवड] | १.५० | १.६३ | १०९ | ५.०० | ५.०० | १००.० |
| ३. | गावठी आंबा/बोर झाडाचे उत्कृष्ट दर्जाच्या जातीमध्ये रुपांतर. | १.५० | ०.५५ | ३७ | १.०५ | १.१५ | ११०.० |
| ४. | जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन. | ०.७५ | ०.६३ | ८४ | ५.२५ | ५.५० | १०५.० |
| ५. | भाजीपाला विकास योजना. | ०.७२ | ०.६१ | ८५ | १०.२५ | १०.५० | १०५.० |
| ६. | पुष्प संवर्धन योजना | ०.५० | ०.०६ | १२ | ०.५५ | ०.६० | १०५.० |

३.९ संदर्भांकित वर्षामध्ये म्हणजे सन १९८६-८७ व १९८७-८८ फलोद्यान विकास योजनांच्या आर्थिक बाजूचा म्हणजे तरतूद व खर्चाचा आढावा घेतल्यानंतर कायिक साध्य व योजनेच्या बाबतीत क्षेत्रानिहाय मिळालेला एकूण प्रतिसाद अभ्यासणे अत्यावश्यक वाटते. त्यानुसार फलोद्यान विकासाच्या अनेकविध योजनांपैकी निवडक योजना प्रामुख्याने कोठे राबविण्यात आल्या व त्यांना मिळालेला क्षेत्रीय प्रतिसाद कसा होता तो खालील तक्त्यामध्ये

दाखविला आहे.

तक्ता क्र. ३.५

फळबाग लागवडीसाठी योजनानिहाय प्रतिसाद मिळालेले जिल्हे

| अनु. क्र. | योजनेचे नांव | प्रामुख्याने कोणत्या विभागात राबविली गेली. | कोणत्या विभागात विशेष प्रतिसाद मिळाला |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | भांडवली अनुदान योजना. | नाशिक, जळगांव, पुणे, धुळे, अमरावती, यवतमाळ | धुळे |
| २. | घरकुल योजना | नाशिक, नांदेड, ठाणे, रायगड, नागपूर, नगर. | नाशिक |
| ३. | गावठी आंबा व बोर झाडांचे उत्कृष्ट जातीवंत झाडात रुपांतर करणे. | जळगांव, धुळे, नाशिक, यवतमाळ | नाशिक व जळगांव. |
| ४. | जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन करणे. | ठाणे, पुणे, धुळे | ठाणे |
| ५. | भाजीपाला विकास योजना [निविष्ठा वाटप] | यवतमाळ, ठाणे, धुळे, अमरावती, नाशिक. | अमरावती, यवतमाळ, ठाणे. |
| ६. | पुष्प संवर्धन योजना | पुणे, चंद्रपूर, यवतमाळ, ठाणे, नाशिक, धुळे. | पुणे, ठाणे, नाशिक, चंद्रपूर, यवतमाळ. |

३.१० वरील तक्त्यातील संदर्भ वर्षाकरिता संकलित केलेली माहिती अभ्यासता असे दृष्टोपत्तीस येते की, योजनांच्या वैशिष्टयपूर्ण गुणधर्मामुळे क्षेत्रनिहाय मिळालेल्या प्रतिसादामध्ये सहयाद्री विभागातील ठाणे, धुळे, नाशिक, जळगांव व पुणे यांचा बराच वरचा क्रमांक लागतो. त्यापाठोपाठ

गोंडवन विभागामध्ये काही योजनांना पाहिजे तितका प्रतिसाद मिळू शकलेला नाही. भाजीपाला विकास योजनेमध्ये मात्र अमरावती, यवतमाळ या गोंडवन विभागातील जिल्ह्यांचा प्रामुख्याने सभाग आहे. पुष्प संवर्धन योजनेत देखिल यवतमाळ, चंद्रपूर या जिल्ह्यातील आदिवासी लाभधारकांनी विशेष सहभाग दर्शविलेला दिसतो.

३.११ यावरून असे अनुमान काढता येईल की, सह्याद्री विभागात विशेष प्रतिसाद मिळालेल्या भांडवली अनुदान योजना, घरकुल योजना, जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन योजना यांना गोंडवन विभागात म्हणावा तितका अनुकूल प्रतिसाद मिळालेला नाही. या उलट गोंडवन विभागात विशेष प्रतिसाद मिळालेल्या भाजीपाला विकास योजना, पुष्प संवर्धन योजना यांना सह्याद्री विभागात संमिश्र प्रतिसाद मिळालेला दिसतो. एकंदरीत असे अनुमान काढणे उचित होईल की, तुलनात्मकदृष्टया कमी भांडवल गुंतवणूकीच्या योजनामध्ये गोंडवन विभागातील आदिवासी लाभधारकांनी पसंती दर्शविलेली आहे. जुन्या फळबागांचे पुनरूज्जिवन करण्याच्या योजनेमध्ये त्यांनी अजिबात रस घेतलेला आढळत नाही. गावठी आंबा, बोर या झाडांचे सुधारित जातीत रुपांतर करण्याच्या योजनेमध्ये केवळ यवतमाळ जिल्ह्याने सहभाग दर्शविलेला आहे. तर सह्याद्री विभागात नाशिक, धुळे, जळगांव यांनी विशेष उत्साह प्रदर्शित केला आहे.

अशाप्रकारे क्षेत्रीय वैशिष्ट्यानुसार योजनांचे बाबतीत मिळालेल्या प्रतिसादानुसार आदिवासी लाभधारकांची क्षेत्रीय पहाणीव्दारे माहिती गोळा करून पृथ्थकरण करण्याचे ठरविले. प्रत्यक्ष लाभार्थींना भेटून फलोद्यान विकास योजनेसंबंधी माहिती संकलन केली. वैयक्तीक लाभधारकांचे योजनेसंबंधीचे अभिप्राय पुढील स्वतंत्र प्रकरणात चर्चिले आहेत.

.....

## प्रकरण-४

## क्षेत्रीय पाहणी अहवालाचा गोषवारा

**प्रस्तावना :**

४.१ क्षेत्रीय पाहणीव्दारे फलोद्यान आदिवासी लाभार्थीसाठी राबविल्या गेलेल्या योजनांची प्रामुख्याने निवड करुन मूल्यमापन केलेले आहे. त्यामध्ये खालील योजनांचा अंतर्भाव आहे.

१. फलोद्यान विकासासाठी भांडवली अनुदान
२. घरकूल योजना
३. निकृष्ट दर्जाच्या आंब्याच्या व बोरांच्या झाडांचे उत्कृष्ट दर्जाच्या जातीमध्ये रुपांतर करणे.
४. जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन करणे.
५. भाजीपाला विकास योजना.
६. पुष्पसंवर्धन योजना.
७. ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजना.

४.२ आदिवासी उपयोजना क्षेत्रातील फलोद्यान विकासाबाबत सर्वसाधारण माहिती गोळा करण्याऐवजी निवडलेल्या भागातून काही लाभार्थींची निवड करुन पाहणी करण्याचे ठरवले. त्याप्रमाणे सर्व योजनांचा अंतर्भाव व्हावा ह्या दृष्टीने एक नमुना पाहणी करण्यांत आली. कारण जिल्ह्यातील दोन तालुक्यातील सर्व लाभार्थींची पाहणी करण्यासाठी लागणारा कालावधी व उपलब्ध असलेली गांववार माहिती इत्यादिचा विचार करुन प्रत्येक जिल्ह्यातून किमान ५० व कमाल ६० लाभार्थींची निवड करुन त्यांची माहिती पत्रकात गोळा करण्यात आली. त्याचप्रमाणे एकूण चार तालुक्यातून १२० लाभार्थींची निवड केली व त्यांची प्रत्यक्ष मुलाखतीतून माहिती संकलित केली.

<u>लाभार्थींची पाहणी :-</u>

४.३ मूल्यमापन पाहणी संदर्भात लाभार्थींकडून मूल्यमापन पाहणीच्या उद्देशांनाच सर्वांगीण माहिती गोळा करता यावी अशा दृष्टीने एक पत्रक तयार करून त्यामध्ये निवडलेल्या १२० लाभार्थींची माहिती गोळा केली. याशिवाय योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांचे अभिप्राय व पाहणीचे उद्देशांना पूरक अशी माहितीही एका वेगळ्या पत्रकात गोळा केली.

वर नमूद केल्याप्रमाणे १२० लाभार्थींकडून गोळा केलेल्या माहितीचे पृथःकरण करण्यांत आले. ही माहिती तक्ता क्र. ४.१ ते ४.११ मध्ये दिलेली आहे.

<u>निवडलेले लाभार्थी :-</u>

४.४ ठाणे जिल्ह्यातील लाभार्थी मुख्यत: मल्हार कोळी आदिवासी जमातीचे असून यवतमाळ जिल्ह्यातील लाभार्थी आंध या अनुसूचित जमातीतील आहेत हे खालील तक्ता क्र. ४.१ वरून लक्षांत येईल.

<u>तक्ता क्र. ४.१</u>

<u>निवड केलेल्या लाभार्थींची संख्या</u>

[जिल्हावार व तहसीलवार जातीनुसार वर्गवारी]

| जिल्हा | तहसील | निवडलेल्या लाभार्थींची वर्गवारी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वारली | मल्हार कोळी | महादेव कोळी | आंध | आमटा ठाकूर | कातकरी | इतर | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ठाणे | डहाणू | ७ | २३ | — | — | — | — | — | ३० |
| | वाडा | — | ३० | — | — | — | — | — | ३० |
| जिल्हा | एकूण | ७ | ५३ | — | — | — | — | — | ६० |
| यवतमाळ | पुसद | — | — | — | ३० | — | — | — | ३० |
| | उमरखेड | — | — | २ | २७ | १ | — | — | ३० |
| जिल्हा | एकूण | — | — | २ | ५७ | १ | — | — | ६० |

लाभार्थींचे शिक्षण :

४.५ निवडलेल्या लाभार्थींमध्ये ५० टक्के लाभार्थी निरक्षर तर ३३ टक्के लाभार्थी ५ वी ते १० इयत्ता पर्यंत शिक्षण पूर्ण केलेले आहेत. १७ टक्के लाभार्थी १ ते ४ थी पर्यंत शिक्षण घेतलेले आहेत. हे तक्ता क्रमांक ४.२ वरुन लक्षात येते.

तक्ता क्र. ४.२

लाभार्थींची शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गवारी

| तहसील | निरक्षर | इ. १ ते ४ | इ. ५ ते ७ | इ. ८ ते १० | इ. १० च्या पुढे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| डहाणू | १३ | ६ | ८ | ३ | -- | ३० |
| वाडा | १७ | ५ | २ | ६ | -- | ३० |
| पुसद | १४ | ६ | ६ | ४ | -- | ३० |
| उमरखेड | १६ | ४ | ९ | १ | -- | ३० |
| एकूण | ६० | २१ | २५ | १४ | -- | १२० |
| टक्केवारी | ५० | १७ | २१ | १२ | -- | १०० |

लाभार्थींचा व्यवसाय :-

४.६ निवडलेल्या लाभार्थींचा मुख्य व्यवसाय शेती होता. ५० टक्के लाभार्थी, शेतमजूर, नोकरी व व्यापार असे दुय्यम व्यवसाय करणारे आहेत. त्यापैकी ८८ टक्के लाभार्थींना दुय्यम व्यवसाय शेतमजूर असून ९ टक्के लाभार्थी नोकरी व ३ टक्के लाभार्थींचा व्यापार [दुकानदार] असा व्यवसायात गुंतलेले आहेत हे चित्र तक्ता क्र. ४.३ वरुन स्पष्ट होते.

तक्ता क्र. ४.३

तालुका निहाय लाभार्थींची मुख्य व दुय्यम व्यवसायानुसार वर्गवारी

| अ. क्र. | तहसीलाचे नांव | मुख्य व्यवसाय | | दुय्यम व्यवसाय | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शेती | मजुरी | शेत मजूर | नोकरी | व्यापार | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | डहाणू | ३० | – | १२ | १ | १ | १४ |
| २. | वाडा | ३० | – | १४ | ४ | – | १८ |
| ३. | पुसद | ३० | – | १० | – | – | १० |
| ४. | उमरखेड | ३० | – | १६ | – | १ | १७ |
| | एकूण – | १२० | – | ५२ | ५ | २ | ५९ |
| | टक्केवारी | १०० | – | ८८ | ९ | ३ | १००% |

लाभार्थींचे वार्षिक उत्पन्न :-

४.७ पाहणीत ५० टक्के लाभार्थी दारिद्री रेषेच्या खाली म्हणजे ३६०० रु. पर्यंत उत्पन्न असलेले आढळून आले. याउलट रुपये ५००१ पेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या लाभार्थींची टक्केवारी फक्त ३३ इतकीच आढळली. खालील तक्त्यावरुन हे अधिक स्पष्ट होते.

तक्ता क्र. ४.४

तालुकावार उत्पन्नाच्या आकारमानाप्रमाणे लाभार्थींची तालुका निहाय संख्या

| अ. क्र. | उत्पन्नाचे आकारमान [रुपयांत] | तहसीलाचे नांव | | | | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | डहाणू | वाडा | पुसद | उमरखेड | | |
| १. | १ ते ५०० | | | – | – | – | |
| २. | ५०१ ते १००० | | | १ | २ | ३ | २ |
| ३. | १००१ ते २००० | ४ | १ | २ | ७ | १४ | १२ |
| ४. | २००१ ते ३६०० | १३ | ४ | १५ | ११ | ४३ | ३६ |
| ५. | ३६०१ ते ५००० | २ | ९ | ५ | ४ | २० | १७ |
| ६. | ५००१ ते १०००० | १० | १२ | ७ | २ | ३१ | २६ |
| [illegible] | [illegible] | – | [illegible] | – | ४ | ८ | ७ |

२९ टक्के लाभार्थींना पाटाचे पाणी मिळत आहे. [illegible] टक्के लाभार्थी नाल्याचे पाणी जमिनीसाठी वापरत आहेत. [illegible] जमिनीसाठी सिंचन सोयीची उपलब्धता विचारात घेता अधिकाधिक लाभार्थींकडे जमीनीला पाणी पुरवठा करता येण्याची सोय उपलब्ध आहे. सिंचन साधनापैकी विहीर हे साधन ब-याच लाभार्थींकडे असल्याचे दिसून आले. त्या खालोखाल पाटाचे पाणी उपलब्ध असणा-या लाभार्थींचा क्रम लागतो.

तक्ता क्र. ४.७

जिल्हावार व तहसीलवार लाभार्थींची जमिनीला पाणी पुरवठयाच्या साधनास्म वर्गवारी

| जिल्हा | तहसील | एकूण | पाणी पुरवठा प्रकारानुरुप लाभार्थींची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विहिर | नाला | तलाव | पाट | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ठाणे | डहाणू | ३० | ७ | – | – | २१ | २८ |
| | वाडा | ३० | १८ | – | – | ४ | २२ |
| जिल्हा | एकूण | ६० | २५ | – | – | २५ | ५० |
| यवतमाळ | पुसद | ३० | १३ | – | – | ०० | १३ |
| | उमरखेड | ३० | १८ | ३ | – | — | २१ |
| जिल्हा | एकूण | ६० | ३१ | ३ | – | — | ३४ |
| एकूण एकंदर | | १२० | ५६ | ३ | – | २५ | ८४ [७०%] |
| टक्केवारी | | – | ६७ | ४ | – | २९ | १०० |

जमिनीची दर्जानुसार वर्गवारी :

४.११ खालील तक्त्यातील माहितीचे पृथक्करण केल्यावर असे दिसते की, ७३ [६१ टक्के] लाभार्थींकडे फलोद्यानास उपयोगी पडेल अशी जमीन आहे. परंतु काही ठिकाणी उन्हाळ्यात पाण्याची टंचाई असते. तर काही ठिकाणी जमीन फळझाडीसाठी जमीन तयार करावी लागेल. म्हणजे त्याला बांध घालणे, टप्पे टप्पे तयार करणे, सपाटीकरण करणे हे केले असता आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जमिनीत फलोद्यान विकास योजनेसाठी भरपूर वाव मिळेल.

तक्ता क्र. ४.८

तालुकावार फलोद्यानास उपयोगी असलेल्या जमिनीबाबत लाभार्थींची वर्गवारी.

| तालुका | एकूण लाभार्थी | फलोद्यानास उपयोगी असलेल्या पण उपयोगात न आणलेली जमीन असलेले लाभार्थी | उपयोगात न आणण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. डहाणू | ३० | ३० | १. गवत [१५]<br>२. पाणी नाही [३]<br>३. मुरमाड [१२] |
| २. वाडा | ३० | २४ | पाणी [६]<br>गवत [१२]<br>रान [५]<br>गुरे [१] |
| ३. पुसद | ३० | १० | पाणी [३]<br>पड [७] |
| ४. उमरखेड | ३० | ९ | १. पाणी [२]<br>२. पड [७] |
| एकूण | १२० | ७३ | |

४.१२ फळबागासंदर्भी लाभार्थींचे मनोगत जाणले असता ठाणे जिल्ह्यातील काही लाभार्थींनी सांगितले की, त्यांना गवतापासून चांगले उत्पन्न मिळते. त्यामुळे ते फळझाडे लावत नाहीत. तर काहींनी सांगितले की, त्यांना राब करण्यासाठी वरकस जमीन लागत असल्याने फळझाडे लावल्यास राब करणेसाठी जमीन शिल्लक राहणार नाही. एकंदरीत लाभार्थींकडे असलेली अपुरी जमिन प्रामुख्याने दिसते.

<u>योजनेचा लाभ व लाभार्थींची वर्गवारी</u> :

४.१३ खालील तक्त्यावरून असे दिसते की, आदिवासी उपयोजनेच्या क्षेत्रात फलोत्पादनबाबतच्या सर्व योजना राबविल्या जात आहेत. आदिवासी त्यामध्ये सहभागी होत आहेत. सर्वात जास्त भाजीपाला व बोर बडींगची योजना अधिकाधिक राबविणा-या लाभार्थींची संख्या जास्त आहे. कारण भाजीपाला, बी-बियाणे तसेच पुष्पसंवर्धनाचे बी-बीयाणे व खते घरपोच दिली जातात त्याचप्रमाणे आंबा, कलम व बोर बडींगसाठी लागणा-या कांड्या देखिल घरपोच पोहोचवण्याची व्यवस्था खात्यामार्फत करण्यात येते. परंतु भाडवली अनुदान योजनेसाठी मोठ्या प्रमाणात लागणारी रोपे रोपवाटिकेमधून लाभार्थींना स्वखर्चाने न्यावी लागतात.

--

## तक्ता क्र. ४.९

## जिल्हावार व तहसीलवार फायदा घेतलेल्या योजनेनुसार लाभार्थींचे वर्गीकरण

| जिल्हा | तहसील | योजनेनुसार लाभार्थींची संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भांडवली अनुदान | घरकुल | आंबा कलम | बोर बडिंग | भाजी-पाला | पुष्प-संवर्धन | भूमी-हीन रोजगार हमी | कोरड-वाहू लागवड |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ठाणे | डहाणू | २५ | १ | ८ | १३ | २१ | – | – | – |
| | वाडा | – | ४ | २८ | ८ | १४ | १ | २ | १२ |
| जिल्हा | एकूण | २५ | ५ | ३६ | २१ | ३५ | १ | २ | १२ |
| यवतमाळ | पुसद | ५ | २७ | – | २९ | ७ | ३ | – | – |
| | उमरखेड | ४ | १३ | – | ६ | २० | २ | ४ | २ |
| जिल्हा | एकूण | ९ | ४० | – | ३५ | २७ | ५ | ४ | २ |
| एकूण | एकंदर | ३४ | ४५ | ३६ | ५६ | ६२ | ६ | ६ | १४ |

### तालुकावार फळझाडाचे वाटप :-

४.१४ खालील तक्त्यावरून असे दिसून येते की, एकूण १२० लाभार्थींपैकी १११ लाभार्थींना रोपे/कलमे/बडींग इत्यादि प्रकारचे वाटप करण्यात आले. त्यापैकी १२ टक्के लोकांना फळझाडांपासून उत्पन्न मिळू लागले आहे. उरलेल्या लाभार्थींना फळझाडापासूनचे उत्पन्न ३ ते ९ वर्षात मिळू शकेल.

एकूण वाटप केलेल्या रोपे/कलमे इत्यादि प्रकारापैकी ७४ टक्के झाडे जगली आहेत. सारांश, बहुसंख्य लाभार्थींना रोपे अथवा कलमे यांचा पुरवठा त्यांच्या मागणीनुसार करण्यात आलेला आहे. परंतु थोडयाच म्हणजे १२ टक्के आदिवासी लाभधारकांना फळझाडापासून नियमित उत्पन्न

मिळू लागले असल्याचे दिसून येते. फळझाडापासून उत्पन्न येण्यास ४ ते ५ वर्षांचा अवधी लागतो. तेव्हा उर्वरित लाभार्थींना फळझाडापासून दोन-तीन वर्षांच्या कालावधीत उत्पन्न मिळू लागेल. कारण वाटप केलेल्या रोपे/कलमांपैकी २/३ रोपे/कलमे जगली असून, जोमाने वाढत आहेत.

तक्ता क्र. ४.१०

तालुकावार फळझाडांचे वाटप व जिवंत झाडांची संख्या

| तालुका | लाभार्थींची संख्या | किती लाभार्थींना झाडे/रोपे कलमे दिली | उत्पन्न किती लाभार्थींना मिळू लागले. | दिलेल्या रोप कलमांची संख्या | जिवंत झाडांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| डहाणू | ३० | ३० | ९ | २५०० | २३३७ |
| वाडा | ३० | २७ | ५ | २४३२ | १४७७ |
| मुरुड | ३० | ३० | ० | १५८३ | ७९७ |
| उमरखेड | ३० | २४ | १ | २४०५ | २०२२ |
| एकूण | १२० | १११ | १५<br>१३% | ८९२० | ६६२२<br>७४% |

लाभार्थींना मिळालेली मदत :-

४.१५ खालील तक्त्यावरून असे दिसते की, विनामूल्य योजनांचा फायदा सर्वात अधिक लाभार्थींना मिळाला असून त्या खालोखाल अनुदानरूपाने मदत घेतलेल्यांचा क्रम लागतो. परंतु कर्जरूपाने फक्त ३४ लाभार्थींनी मदत मिळविली आहे. त्यावरून असे अनुमान काढता येईल की, कर्ज स्वरूपातील योजनांचा लाभ घेण्यास आदिवासी भूधारक फारसे उत्सुक दिसत नाहीत.

तक्ता क्र. ४.११

## लाभार्थींना मिळालेल्या मदतीच्या स्वरूपानुसार लाभार्थींचे वर्गीकरण

| अ. क्र. | तहसील | योजनेच्या मदतीचा प्रकार | | |
|---|---|---|---|---|
| | | कर्ज | अनुदान | विनामूल्य |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | डहाणू | ४५ | २१ | २२ |
| २. | वाडा | – | ३७ | ३२ |
| ३. | पुराद | ५ | ३२ | ३४ |
| ४ | जव्हार | ४ | ८ | ३९ |

आर्थिक लाभ झालेले लाभार्थी :

४.१६ खालील तक्त्यातील माहितीचे पृथ:करण केले असता असे आढळते की, दोन्ही जिल्हयांचा एकत्रित विचार केला असता ७० टक्के लाभार्थींना आर्थिक फायदा झालेला दिसून येतो. त्यापैकी ५० टक्के लाभार्थींना भाजीपाल्याच्या लागवडीमुळे आर्थिक फायदा झालेला दिसतो. तर उरलेल्या लाभार्थींना फळबागाव्दारे आर्थिक लाभ झाला आहे. हे लाभाचे प्रमाण जरी कमी असले तरी चार ते पाच वर्षात त्यामध्ये लक्षणीय वाढ होईल असे लाभार्थींना खात्री वाटते. कारण ब-याच लाभार्थींची नवीनच रोपे/कलमे लावली असून बोरांना बडींग करून घेतले आहे. त्यामुळे झाडांना फळे येण्यात ३ ते ४ वर्षांचा कालावधी लागणार आहे. याची जाणीव लाभार्थींना असल्याचे दिसते.

नक्शा क्र. ४.२२

जिल्हावार व तहसीलवार योजनेमुळे आर्थिक फायदा झालेल्या लाभार्थींची संख्या व टक्केवारी.

| जिल्हा | तहसील | आर्थिक फायदा झालेल्या लाभार्थींची संख्या. | लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ठाणे | डहाणू | ३० | ३० | १००% |
| | वाडा | १५ | ३० | ५०% |
| जिल्हा | एकूण | ४५ | ६० | ७५% |
| यवतमाळ | पुसद | १९ | ३० | ६३% |
| | उमरखेड | २० | ३० | ६७% |
| जिल्हा | एकूण | ३९ | ६० | ६५% |
| एकूण एकंदर | | ८४ | १२० | ७०% |

**लाभार्थींच्या उत्पन्नात वाढ :**

४.१७ खालील माहितीचे पृथ:करण करता असे निदर्शनास येते की, ७१ टक्के लाभार्थींचे उत्पन्न ५०० रु. पर्यंत वाढले असून फक्त २३ टक्के लाभार्थींचे उत्पन्न १००१/- रु. पेक्षा जास्त वाढलेले आहे. त्यामध्ये काही कालानंतर लक्षणीय वाढ होईल असे वाटते. कारण फळबागामधून मिळणारे उत्पन्न काही कालांतरानेच हाती येत असते. थोडक्यात असे भाष्य करता येईल की, फळबागापासून सुरुवातीला अल्प प्रमाणात फायदा दृष्टोत्पत्तीस येतो. परंतु यथावकाश क्रमाक्रमाने उत्पन्नात भर पडत जाऊन भरघोस पीकातून भरपूर प्राप्ती आदिवासींना मिळू शकते.

तक्ता क्र. ४.१३

उत्पन्नातील वाढीनुसार लाभार्थींची वर्गवारी

| अ. क्र. | उत्पन्नातील वाढ | तहसिलप्रमाणे लाभार्थींची संख्या | | | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | डहाणू | वाडा | पुसद | उमरखेड | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | ०-१० | ३ | – | – | १ | ४ | ५ |
| २. | १०१-३०० | ५ | ४ | ७ | ६ | २२ | २६ |
| ३. | ३०१-५०० | ११ | ८ | ७ | ८ | ३४ | ४० |
| ४. | ५०१-१००० | ५ | – | – | – | ५ | ६ |
| ५. | १००१ पेक्षा जास्त | ६ | ३ | ५ | ५ | १९ | २३ |
| | एकूण- | ३० | १५ | १९ | २० | ८४ | १०० |

## पाहणीतील निष्कर्ष :

क्षेत्रीय पाहणीसाठी निवडलेल्या दोन जिल्ह्याच्या आधारे थोडक्यात असे निदर्शनास येते की,

[१] ठाणे जिल्ह्यातील लाभार्थींना भात पीकापासून अधिक उत्पन्न मिळते. त्यामुळे फळबागांकडे त्यांचा कमी ओढा आहे. कारण राब घेण्यासाठी शेतजमीन उपलब्ध होत नाही.

[२] फलोत्पादन योजनेचा अधिक फायदा ठाणे जिल्ह्यातील मल्हारकोळी तर यवतमाळ जिल्ह्यातील आंध या जमातींनी घेतलेला दिसतो. त्यामानाने त्या तालुक्यातील वारली, कातकरी, कोलाम, गोंड अनुसूचित जमातीच्या शेतक-यांनी फायदा घेतलेला नाही.

[३] दोन्ही जिल्ह्यांमध्ये ५ एकरापेक्षा कमी जमीन असलेले लाभार्थी सुमारे ६० टक्के इतके आहेत तर १० एकरापेक्षा जास्त जमीन असलेले लाभार्थी शेतकरी केवळ १० टक्केच आहेत.

[४] सुमारे ८८ टक्के लाभार्थींचा दुय्यम व्यवसाय शेतमजूरी आहे तर ९ टक्के लाभार्थी नोकरीमध्ये व ३ टक्के लाभार्थी व्यापार उदीम या व्यवसायात गुंतलेले आहेत.

[५] सुमारे ५० टक्के लाभार्थी दारिद्र्य रेषेच्या खाली आहेत. परंतु रु. ५००१ पेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या लाभार्थींची संख्या ३३ टक्के इतकी आहे.

[६] सुमारे ७० टक्के लाभार्थींकडे जमिनीला पाणी पुरवठा करण्याचे साधन उपलब्ध आहे. त्यापैकी ६७ टक्के लाभार्थींना विहिरीचे २९ टक्के लाभार्थींना कालव्याचे तर ४ टक्के लाभार्थींना नाल्याचे पाणी सिंचनासाठी उपलब्ध आहे.

[७] आदिवासी उपयोजना क्षेत्रात फलोत्पादन विकासांतर्गत सर्व योजना राबवल्या जात असल्या तरी भाजीपाला बोर बडींग [डोळे भरणे] या योजनांचा अधिक प्रतिसाद दिसून येतो.

[८] वाटप केलेल्या शेळ्यांपैकी ७४ टक्के शेळी/मेंढी जगली आहेत.

[९] "विनामूल्य" योजना स्वरूपातील योजनांचा सर्वात अधिक फायदा मिळाला असून त्यानंतर अनुदान योजना व कर्ज योजनांचा क्रम लागतो. आदिवासी कर्ज घेण्यास फारसे उत्सुक नाहीत.

[१०] एकूण लाभार्थींपैकी फक्त १२ टक्के लाभार्थींना फळ झाडांपासून उत्पन्न मिळू लागले आहे. तर इतरांना ३ ते ४ वर्षात उत्पन्न मिळू लागेल.

[११] फळबागातून सुमारे ७१ टक्के लाभार्थींचे उत्पन्न रु.५००/- पर्यंत वाढले आहे. तर २३ टक्के लाभार्थींचे उत्पन्न १००१ पेक्षा अधिक झाले आहे. काळाच्या ओघात उत्पन्नात लक्षणीय वाढ होईल कारण फळझाडांचे उत्पन्न थोडे उशीरा हाती येते.

.....

## प्रकरण [५]

## सर्वसाधारण निरीक्षणे व निष्कर्ष

प्रस्तावना :

५.१ क्षेत्रीय पाहणी अंतर्गत निवडलेल्या लाभार्थींच्या प्रत्यक्ष मुलाखतीव्दारे उपलब्ध झालेल्या माहिती व फलोत्पादन विकास योजना राबवित असणा-या अधिका-यांचे अभिप्राय विचारात घेता निरीक्षणातून खालील मुद्दे उपस्थित झाले त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

१. लाभार्थींची सामाजिक व आर्थिक स्थिती :

निवडलेल्या लाभार्थींपैकी ५० टक्के लाभार्थी निरक्षर असल्याने फळबाग विकास कार्यक्रमामध्ये अंतर्भूत असलेल्या योजनांची त्यांना पूर्णपणे माहिती मिळालेली नाही. परिणामत: योजनेचा संपूर्ण फायदा त्यांना घेता आलेला नाही. उदा. नारळाची रोपे वाटप केल्यानंतर त्यांना खताचे औषधाचे वाटप होणार होते. परंतु खताचे अगर औषधाचे वाटप झाले नाही. फक्त रोपांचे वाटप करण्यात आले.

२. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती :

ठाणे जिल्हयात कोरडवाहू फळझाडांची लागवड करण्यास पुष्कळ वाव आहे. परंतु आदिवासींना भातापासून जास्त फायदा होत असल्याने फळझाडांची लागवड मोठया प्रमाणावर करण्यास ते धजत नाहीत. पर्यायाने फळझाडांची लागवड कमी प्रमाणात आढळते.

२. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील बराचसा भाग डोंगराळ असल्याने जमिन प्रामुख्याने डोंगर उतारावरील आहे. तसेच पावसाचे प्रमाण जास्त असल्याने जमिनीची धूप मोठया प्रमाणावर होत असते. त्यामुळे फळझाडांची लागवड करणे शेतकरी पसंत करत नाहीत.

३. जमिन मुरमाड व दरकट असल्याने पाणी मुरण्याचे प्रमाण फारच कमी आहे. त्यामुळे पावसाळ्यात ओढयांना पूर येतात. तर उन्हाळ्यात विहिरीत पाणी मिळत नाही. याशिवाय पाणी साठवून ठेवण्याच्या योजना या क्षेत्रात उपलब्ध नाहीत.

४. भौगोलिक परिस्थितीमुळे जलसिंचनाच्या योजना राबविणे कठीण जात असल्याने व त्याला वाव नसल्याने आदिवासी भागात मोठया प्रमाणात बागायत क्षेत्र उपलब्ध होईल असे वाटत नाही. परंतु कोरडवाहू फळझाडे लावण्यासाठी जमीन व हवामान अनुकूल आहे. त्याचा फायदा शेतक-यांना करून देणे यातच या योजनांचे यश सामावलेले आहे.

५. हवामान, पाणी व जमीनीचा प्रकार हयाचा विचार केला असता आदिवासी भागात कमी पाणी लागणा-या फळझाडांना त्याचप्रमाणे कोरडवाहू फळझाडांच्या लागवडीस फार मोठया प्रमाणात वाव आहे. यासाठी हवामानानुसार फळझाडांची निवड करणे जरूरीचे असते.

६. आंबा लागवडीसाठी यवतमाळ जिल्हयात जमीन व हवामान या दोन्ही गोष्टी अनुकूल नाहीत असे दिसते. कारण गेल्यावर्षी क्षेत्रीय पाहणीतील गावात १०० झाडांची लागवड केली होती. परंतु सर्व झाडे सुकून नष्ट झाली.

३. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जमीन प्रतवारी व जमीन धारणा-

पाहणीमध्ये असे आढळून आले आहे की, ६० टक्के लाभार्थींकडे ५ एकरापेक्षा कमी जमीन असून त्यांच्याकडे पाण्याची सोय नाही. काही जमिनीतून ओढे-नाले जात असल्याने त्याचे पाणी काही हंगामापुरते फक्त उपलब्ध होते.

२. पाहणीमध्ये असे आढळून आले आहे की, ८७ टक्के लाभार्थींची जमीन मध्यम प्रकारची होती, तर ३ टक्के लाभार्थींची जमीन भारी प्रतीची होती. मात्र १० टक्के लाभार्थींची जमीन हलक्या माळरान स्वरूपातील होती.

३. निवडलेल्या ८७ टक्के लाभार्थींकडे मध्यम प्रकारची जमीन असून त्यापासून उत्पन्न होणारे धान्य त्यांना वर्षभर पुरत नाही. त्यामुळे त्यांना शेतीशिवाय दुय्यम व्यवसाय करावा लागतो. परिणामत: तो नेहमी आर्थिक विवंचनेत असतो. नवीन योजना राबविण्यास तो सहसा पुढे येत नाही. कारण नवीन योजनेमुळे फायदा होईलच ह्याची खात्री वाटत नाही. आधीच कमी उत्पन्न देणाऱ्या जमिनीत फळझाडांची लागवड करण्यास आदिवासी तितकासा उत्सुक नाहीत.

४. फळबाग संयोजनातील सदोषता :

एकूण फळझाडांच्या रोपांच्या वाटपापैकी २६ टक्के रोपे नष्ट झाली आहेत. कारण ती मुळत: कमजोर होती. त्यामध्ये ठाणे जिल्हयातील नारळाच्या रोपांचा तर यवतमाळ जिल्हयातील संत्र्याच्या रोपाचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो. रोपांचा किंवा कलमाचा पुरवठा सदोष असता कामा नये.

२. गेले तीन चार वर्षे पर्जन्यमान कमी झाल्याने काही भागात विहिरी आटल्या. काही विहिरींना वर्षभर पाणी टिकले नाही. त्यामुळे फळबागा धोक्यात आल्या. पाटाचे पाणी फक्त अन्नधान्यासाठी मिळत असल्याने नियमानुसार फळबागांसाठी पाणी मिळू शकले नाही. अन्नधान्य प्रमाणेच फळबागांनाही पाणी दिले गेले पाहिजे.

५. फळबाग संयोजनातील अडीअडचणी व समस्या :

आदिवासी उपयोजना क्षेत्रात जुन्या फळबागा फारच थोडया आहेत. तसेच त्यांचे पुनर्जीवन करणेसाठी शासनाने केलेली आर्थिक तरतूद फारच तुटपुंजी असल्याने ह्या योजनेचा फारसा फायदा आदिवासींना घेता येत नाही.

२. बँकेतून आदिवासींना सहजा सहजी कर्ज मिळत नाही. त्यासाठी त्याला बरेच हेलपाटे मारावे लागतात. कर्ज प्रकरणाबरोबर द्यावयास लागणारी कागदपत्रे दाखले जमा करता करता आदिवासी कंटाळून जातो. अशा परिस्थितीत कर्ज घेऊन फळबागा लावण्याच्या फंदात तो पडत नाही.

३. आदिवासींना कोरडवाहू फळझाडाचे महत्व पटू लागले आहे. कांही शेतक-यांनी चिंचेची रोपे मोठ्या प्रमाणात लावली आहेत. परंतु गावातील भांडणामुळे काही रोपे उपटून टाकली व ती गुरांना खाऊ घातली. त्यामुळे फळबाग लागवड योजना राबविण्यावर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे.

४. आदिवासी भागात गावठी बोरांची बरीच झाडे असल्याने त्या झाडावर डोळा भरुन घेण्यास आदिवासी फार उत्सुकता दाखवतात. परंतु बोरीचे मातृवृक्ष कमी असल्याने व ठराविक हंगामात डोळे भरण्याचे काम करावे लागत असल्याने सर्वांची मागणी पूर्ण करणे शक्य होत नाही.

५. असे निदर्शनास आले आहे की, गांवठी बोरांच्या झाडावर कोणत्याही प्रकारचा रोग पडत नाही. परंतु डोळे भरलेल्या झाडावर रोग पडतो. त्यावर औषध फवारणीची योजना शासनाकडे नसल्याने त्या बोराच्या झाडावर औषध फवारणी केली जात नाही. कारण गरीब आर्थिक स्थितीमुळे आदिवासी औषध स्वत: विकत घेऊन मारु शकत नाही व आवश्यक ती फवारणी करु शकत नाही.

६. कित्येकवेळा आदिवासींना प्रत्यक्ष फळझाडांची रोपे आणून दिली जातात व ती तावडतोब लावावयास सांगतात अशावेळी पूर्वतयारी शिवाय योग्य त-हेचे खड्डे खणणे व खड्ड्यात कंपोस्ट खत घालणे औषध टाकणे, रासायनिक खते टाकणे इत्यादी गोष्टी करणे आदिवासींना शक्य होत नाहीत. मग ती रोपे आदिवासी अयोग्यरितीने लावतात. त्यामुळे योजनेचा मुख्य उद्देश फलद्रूप होत नाही.

७. भाजीपाल्याच्या निविष्टेचे वाटप गावात दोन किंवा तीन लाभार्थींना केले जाते व ते सुध्दा गावात ठिकठिकाणी विखुरलेले असतात, त्यामुळे भाजीपाल्याचे होणारे उत्पन्न गावातच विकावे लागते. त्याला योग्य भाव मिळत नाही. त्याचप्रमाणे पुष्प संवर्धनाबाबत सुध्दा फुले तयार झाली की तावडतोब बाजारात नेणे आवश्यक असते. ते आदिवासींना जमत नाही. त्यांना बाजार उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्यापासून

८. आदिवासी शेतकरी फलोत्पादनाच्या योजना राबविण्यात उत्सुक आहेत. परंतु फलोत्पादन विकास खात्याचे कर्मचारी सर्व ठिकाणी जाऊ शकत नसल्याने कांही वेळा योजना राबविल्या जात नाही. आणखी असे निदर्शनास आले आहे की, बोरीला डोळा भरणेसाठी आदिवासी बोरांच्या झाडांची छाटणी करुन ठेवतात. पण फलोद्यानाचे कर्मचारी वेळेवर तेथे न गेल्याने त्या झाडांना डोळे भरण्याचे काम करता आले नाही. त्याचप्रमाणे आंबा कलमे करणे, रोपांची लागवड करतांना तांत्रिक मार्गदर्शन केले जात नाही. परिणामत: आदिवासी शेतकरी सदर योजनेपासून वंचित राहतो. त्याला आर्थिक लाभास मुकावे लागते.

९. फळबागा लागवडीसंबंधात तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन करण्यासाठी तालुका पातळीवर फलोद्यान विभागाचे दोन किंवा तीन कर्मचारी देण्यात आले आहेत. परंतु त्यांचे तालुका पातळीवर कार्यालय नसल्याने त्यांची तात्पुरती सोय गटविकास अधिकारी पंचायत समिती यांचे कार्यालयात करण्यात आली आहे. परंतु त्यांचेवर गटविकास अधिकारी यांचे नियंत्रण नसते. सदर कर्मचारीवृंद तांत्रिक सल्ल्यासाठी वेळेवर शेतकऱ्यांना उपलब्ध असत नाही. आदिवासी शेतकऱ्याला बरेच हेलपाटे मारावे लागतात. परिणामत: योग्यवेळी तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन आदिवासी लाभधारकास उपलब्ध होऊ शकत नाही.

<u>फळबागांचे फायदेशीर स्वरुप</u> :

१. फलोद्यानामुळे शेतकऱ्यांना बारा महिने काम मिळते. फलोत्पादनास पुरक असे नवीन व्यवसाय धंदे गावातून निघू शकतील. उदा. टोपल्या तयार करणे, करंडे तयार करणे, फळे काढणेसाठी खुड्या तयार करणे, इत्यादि उपयोगामुळे गावांतील बुरुड, लोहार व सुतार ह्या लोकांना गावांत काम मिळू शकेल.

२. निवडलेल्या लाभार्थींपैकी जवळ जवळ ७५ टक्के लाभार्थींना आर्थिक फायदा झालेला आहे. त्यामध्ये मुख्यत: भाजीपाला निविष्ठा वाटप ह्या योजनेचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. त्यानंतर बोर झाडांना डोळे भरण्याचा, इतर फळझाडे लागवड ह्या योजनेचे दृश्य स्वरूपातील फायदे मिळण्यास अद्याप कांही वर्षे लागणार आहेत.

३. फळझाडांना फळे लागून आर्थिक फायदा झालेल्या लाभार्थींची संख्या फक्त १५ असून तीची टक्केवारी फक्त १२ आहे. कांही लाभार्थींकडे फळझाडांची लागवड नुकतीच झाली आहे. त्यामुळे त्यांना फळे लागण्यास अवधी आहे. यथावकाश आर्थिक फायदा दृगोचर होईल.

.....

## प्रकरण ६ वे

## सूचना तथा शिफारसी

[१] फळझाडांची रोपे/निविष्टा वाटप :

१. भाजीपाल्याच्या निविष्टा आश्रमशाळेच्या जवळपासच्या गावांना वाटप कराव्यात म्हणजे परिसरातील आश्रमशाळा त्यांचा भाजीपाला योग्य दराने विकत घेऊ शकतील तसेच आदिवासींना कमी भावाने भाजीपाला विकावा लागणार नाही व त्यांना आर्थिक फायदा होईल.

२. ठाणे जिल्हयांत नारळाची रोपे वाटप केलेली आहेत, त्या लाभार्थींना रासायनिक खताचे वाटप करणे जरुरीचे आहे.

३. रोपे वाटप करताना कमजोर रोपांचे वाटप करु नये, काही कारणांनी रोपे गेली तर त्या जागी दुस-या वर्षी अगर लवकरात लवकर दुसरी रोपे लावण्यासाठी आदिवासींना मदत करावी व ती रोपे मोफत वाटावीत.

४. हवामान व जमिनीचा कस यांचा विचार केला असता ठाणे जिल्हयात आंबा, फणस, अननस, काजू, कोकम, नारळ व सुपारी हयासारख्या फळबागांना पुष्कळच वाव आहे, तर कोरडवाहू विभागात चिंच, आवळा, जांभूळ चारोळ्या इ. फळझाडे जोमाने वाढण्यास अनुकूल वातावरण आहे. विशेषत: यवतमाळ जिल्हयात चिंच, आवळा, जांभूळ व बोरी या फळझाडांना पुष्कळच वाव आहे. तेव्हा त्यांची लागवड फायदेशीर होऊ शकेल.

५. आदिवासींना फळझाडांचे वाटप करणार आहोत हयाबाबत आधी सूचना द्यावी व त्यांच्याकडून विशिष्ट प्रकारचे व योग्य त्या पध्दतीने खड्डे भरुन घ्यावेत आणि नंतरच फळझाडांचे वाटप करावेत, म्हणजे रोपांचे मरीचे प्रमाण कमी होईल व चांगल्या प्रकारे फळे वहरु लागतील.

६. पुष्पसंवर्धन, भाजीपाला योजना इ. योजना राबविताना त्या समूह स्वरूपात राबविली जाणे आवश्यक वाटते. तरच त्यांचा फायदा चांगला होईल. यासाठी ती समूह [चार पाच शेतकरी एकत्र] स्वरूपात राबवावी.

७. फळबागासंबंधी आदिवासींमध्ये जागृती करून कमी उत्पन्न देणाऱ्या जमिनीत फलोद्यान बागा लावणेसाठी प्रचार मोहिम हाती घ्यावी व प्रत्येक [illegible] अगर मोक्याच्या गावात अशा फळबागा तयार करून तेथे आदिवासींना सहलींच्या निमित्ताने नेऊन फळबागा कशा फायदेशीर होतात हे पटवून द्यावे.

[२] <u>फळबागाचे संगोपन व आर्थिक सहाय्य</u> :-

१. योजना राबविल्यावर त्या योजनेमध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश आहे, याबाबत प्रत्येक लाभार्थीला कार्ड देणे व त्या कार्डावर लाभार्थीला मिळावयाचे व मिळालेल्या फायद्याची नोंद ठेवावी, म्हणजे अडाणी व गरीब आदिवासीसुध्दा सुशिक्षित आदिवासींकडून माहिती करून घेऊन सर्व फायदे करून घेतील.

२. फळझाडांची लागवड प्रथमत: बांधावर ज्या ठिकाणी पीक येत नाही, अशा ठिकाणी करून दाखवावी, म्हणजे त्यांची चालू पीके निघतील. काही वर्षांनी फळझाडापासून उत्पन्न सुरु झाल्यानंतर पीक क्षेत्रात फळझाडांची लागवड होईल.

३. ज्या ठिकाणी विहिर, तलाव, यांचे पाणी उपलब्ध आहे, त्या ठिकाणी पाण्यावरील फळझाडांची लागवड करावी. परंतु ओढ्याच्या काठी कोरडवाहू चिंच, आवळा, कवठं, बोरं यांची लागवड करावी.

४. डोंगर उताराच्या जमिनीच्या बांधाबंदिस्ती करुन घ्यावी, त्यावर टप्पाटप्प्याची जमीन तयार करुन त्यावर कोरडवाहू चिंच, आवळा व बोर ह्यासारखी फळझाडे लावावीत.

५. आदिवासींना शेतीला पूरक असलेला धंदा उपलब्ध व्हावा म्हणून डोंगर भागात कोरडवाहू फळझाडे इंधन पुरविणारी झाडे, सामाजिक वनीकरणासारखे कार्यक्रम राबवावेत.

६. जमिनीत पाणी जिरवण्यासाठी काही ठिकाणी पाणी अडवून ठेवावे व त्याचा उपयोग उन्हाळ्यात केला जावा.

७. विहिर खोदाई, ऑईल इंजिन व वीजेवरील पंप ह्या सारखी कर्ज प्रकरणे मंजूर करताना त्यांच्यावर फळझाडांची लागवड करण्याबाबत बंधन घालावे.

८. ज्या आदिवासींच्या फळबागा विहिरीच्या पाण्यावर आहेत त्या विहिरींना बोअर करुन घ्यावीत व पाण्याची सोय करावी. उन्हाळ्यात पाटाचे पाणी उपलब्ध असेल तर फळबागांसाठी पाणी देण्याची सोय करावी. त्यासाठी सिंचन विभागाने पाणी वाटप नियमात तसे अनुकूल फेरबदल करावेत. ज्यायोगे फळझाडांना पाण्याची व्यवस्था उपलब्ध होऊ शकेल.

९. आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील काही ठिकाणी जुन्या फळबागा आहेत, ह्याचे पुनर्जीवन करता येईल. परंतु शासनाने ठरविलेली आर्थिक तरतूद अतिशय तुटपुंजी असल्याने त्या तरतुदीत राहून आदिवासी फळबागांचे पुनर्जीवन करु शकत नाही. तेव्हा आर्थिक तरतुदीत वाढ केल्यास ब-याच शेतक-यांना फायदा होईल.

१०. सुधारित केलेल्या बोरांच्या झाडावर रोग पडू नये, म्हणून औषध फवारणी पथक योजना तयार करावी व आदिवासींच्या बोरीवर मोफत औषध फवारणी करावी म्हणजे बोरीचे उत्पन्न वाढून आदिवासींचा आर्थिक लाभ होऊ शकेल.

११. छोटेगावांत भाऊबंदकी, बांधावरील भांडणे, जमिनीचे तंटे इ. कारणामुळे लोकांमध्ये वैरभाव असतो व त्याचा परिणाम लावलेली फळझाडे उपटून टाकणे किंवा गुरांना खाऊ घालणे ह्यासारखे प्रकार गावांतून होतात. त्यावर निर्बंध घालण्यासाठी लोकांमध्ये प्रचार करुन सामाजिक जाणीवेची भावना निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कायदेशीर दंडाची तरतूद करावी म्हणजे अशाप्रकारांना चांगला आळा बसेल.

१२. बँकांनी आदिवासी लोकांची शैक्षणिक पात्रता, त्यांचा स्वभाव इत्यादिचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन आवश्यक तेवढीच कागदपत्रे घेऊन कमीत कमी वेळात कर्ज मंजूर करण्याबाबत कार्यवाही करावी.

१३. कर्ज मंजुरीनंतर करारनामा करतेवेळी जो स्टॅम्पचा खर्च येतो तो आदिवासींना माफ करावा.

१४. फळझाडांचे लागवडीनंतर त्याला कुंपण करण्यासाठी योजना आखावी म्हणजे चुकार व भटक्या जनावरांपासून फळरोपांचे संरक्षण होण्यास मदत होईल. आदिवासी फळबाग धारकांना नुकसानीस तोंड द्यावे लागणार नाही.

१५. ठाणे जिल्हयात कवठ, चिंच, आवळा, हिरडा, चारोळी, विवा, पानवेल, मसाल्याचे पदार्थ, कोकम इ. लागवड प्रकल्प तयार करावा तर यवतमाळमध्ये चिंच, आवळा, सिताफळ व बोरीची लागवड प्रकल्प हाती घेणे जरुरीचे वाटते.

१६. फळबागा भांडवली अनुदान योजनेखाली असलेले अनुदान ३३ टक्याऐवजी ५० ते ७५ टक्के करावे म्हणजे मोठ्या संख्येने आदिवासी सदर योजनेमध्ये सहभागी होतील.

१७. शासकीय कर्जासाठी लागणारे तारण आदिवासी देऊ शकत नसल्याने त्यांची हमी राज्य शासनाने द्यावी.

१८. नाममात्र व्याजाने आदिवासींना कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे.

[३] <u>फळबागांसाठी तांत्रिक मार्गदर्शन व कर्मचारीवृंद</u> :

१. आदिवासी उपयोजनेतील गावे तशी दुर्गम भागात असतात. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी फलोत्पादन विकास खात्याचे अधिकारी किंवा कर्मचारी जाऊ शकतील असे नाही. त्यासाठी त्यांनी आंब्याला कलमे करणे, बोरीला डोळे भरणे इ. सारखी कामे करण्यासाठी गावांतील स्थानिक सुशिक्षित लोकांना प्रशिक्षण देऊन तयार करावे व त्यांना प्रात्यक्षिके दाखवून ती कामे करुन घ्यावीत व त्यांच्या कामावर देखरेख त्यांनी ठेवावी व मिळणारा मेहनताना काम करणाऱ्या माणसाला मिळाला तर त्याला पण थोडे बहुत पैसे मिळतील.

२. बोर झाडांच्या बडींगसाठी [डोळे भरणे] प्रत्येक चार पाच गावांतून मातृवृक्ष तयार करुन त्यांच्या कांड्या आदिवासी लोकांमध्ये जे लोक डोळे भरावयाचे काम करतील त्यांना वाटून त्यांच्याकडून हे काम करुन घ्यावे.

३. ठाणे जिल्हयातील आदिवासी गवताचे उत्पन्नावर अवलंबून असतात. परंतु त्यांना फळबागेचे महत्व पटवून फळझाडापासून उत्पन्न जास्त होते, हे काही ठिकाणी प्रात्यक्षिकाचे प्लॉट घेऊन दाखवावेत. तसेच गवताच्या ठिकाणी झाडांची लागवड करुन गवताच्या पिकांबरोबर झाडांची वाढ होऊ शकते. तेही त्यांना पटवून द्यावे.

४. तालुका पातळीवर फलोत्पादन खात्याचे कर्मचारीवृंद कामाचे मानाने कमी पडत असल्याने त्यांच्या संख्येमध्ये वाढ व्हावी व त्यांचे कार्यालय तालुका पातळीवर उघडून तेथे एक फलोत्पादन अधिकारी, फलोत्पादन सहाय्यक, पांच फलोत्पादन सुपरवायझार व पंचवीस

आणि असा कर्मचारी वर्ग नेमावा. ज्यायोगे आदिवासी लोकांशी संपर्क साधून योजना चांगल्याप्रकारे राबविल्या जातील, आदिवासींना तांत्रिक मार्गदर्शन व मदत सहज मिळू शकेल.

[४] फळांची विक्री व्यवस्था :-

१. तालुक्यातून फळ लागवड व भाजीपाला उत्पादक सोसायटी स्थापन करुन त्यांच्यामार्फत फळांची, भाजींची व फुलांची विक्री व्हावी, म्हणजे ती फायदेशीर होईल.

२. बँकेतून लाभार्थींना मिळणाऱ्या कर्जाबाबत बँकेनी सतत लाभार्थींशी संपर्क राखणे आवश्यक आहे. फळबाग व भाजीपाला उत्पादक सोसायटीव्दारा वसुली होण्यास मदत होईल.

[५] फळबागांचे संवर्धनातून ग्रामीण रोजगार निर्मिती व उद्योगधंदे :

१. आदिवासी भागात उपलब्ध असलेला बांबू, कळक इत्यादि पासून टोपल्या करणे, फळे काढण्यासाठी झाडया तयार करणे इ. सारखे लघुउद्योग फळबाग क्षेत्रात सुरु करावेत. म्हणजे ग्रामीण कसबी कारागीरांना वर्षभर पूर्णवेळ काम मिळेल.

२. फळांपासून लोणची तयार करणे, मुरंबे तयार करणे, रस काढणे व वाळवून त्यापासून पदार्थ तयार करणे इ. सारखी उत्पादने तयार करण्यासाठी त्याचे उद्योगधंदे सुरु करावेत.

३. फळबाग क्षेत्रात मालाची तोडणी झाल्यावर कमीत कमी नुकसान होईल याची दक्षता घेणे जरुरीचे आहे. योग्य तो भाव मिळविणे, प्रतवारी ठरविणे, पॅकींग करणे, माल टिकविणे व वाहतूक करणे इत्यादी गोष्टींचे आदिवासी युवकांना प्रशिक्षण द्यावे. त्यामुळे ग्रामीण क्षेत्रात तरुणांना रोजगार उपलब्ध होण्यास याव्दारे मदत होईल.

परिशिष्ट नं.१

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येत असलेल्या क्लोगत
विकासाबाबत मूल्यमापन पाहणी- १९८८

प्रपत्र क्रमांक - [१]
[लाभधारकाची माहिती]

चौक नं. १

- सर्वसाधारण माहिती -

संकेतांक

१. जिल्हा .................................... [ ]

२. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे ............. नांव [ ]

३. तालुका ........................ [ ]

४. गांव ........................ [ ]

५. पाडा ........................ [ ]

६. फायदा घेतलेल्या योजनांची गावे १. [ ]
२. [ ]
३. [ ]

७. लाभधारकाचे नांव

७ [अ] निवड क्रमांक

८. आदिवासी जमातीचे नांव ........,.... [ ]

९. वय [ ]

१०. शिक्षण [ ]

११. कुटुंबातील एकूण माणसे ........... [ ]

१२. कुटुंबातील मिळवती माणसे ......... [ ]

१३. लाभार्थी दारिद्र्य रेषेखाली/दुर्बल घटक आहे काय ? होय/नाही [ ]

१४. मुख्य व्यवसाय .................... [ ]

१५. दुय्यम व्यवसाय .................. [ ]

१६. वार्षिक उत्पन्न अ] पूर्वीचे रु. ........... [ ]
ब] आताचे रु. ..........

चौक नं. २

## शेतीबाबत माहिती

| | | हे. | आर./[एकर-गुंठा] |
|---|---|---|---|
| १७. | लाभार्थीच्या मालकीची एकूण जमीन | | |
| १८. | कसत असलेल्या जमीनीचे क्षेत्रफळ | | |
| १९. | पडिक जमीनीचे क्षेत्रफळ | | |
| २०. | कसत नसलेली/पडीक जमीन फलोद्यानास उपयोगी पडेल काय ? | होय/नाही | |
| २१. | फलोद्यानासाठी ही जमीन उपयोगी पडत असेल तर ती का वापरली जात नाही. | १. ....................<br>२. ....................<br>३. .................... | |

| | | प्रकार | क्षेत्रफळ [एकर] |
|---|---|---|---|
| २२. | साधारण जमीन कोणत्या प्रकारची आहे. [भारी/मध्यम हलकी] | १. भारी :<br>२. मध्यम :<br>३. हलकी : | |
| २३. | शेतीसाठी पाण्याची सोय आहे काय ? | होय/नाही | |
| २४. | फलोद्यानासाठी पाण्याची सोय कशी करता येईल. | १. ....................<br>२. ....................<br>३. .................... | |
| २५. | पाण्याच्या सोयीसाठी तुम्ही काही प्रयत्न करीत आहात काय ? | होय/नाही | |

चौक क्र. ३

२६. फलोद्यान योजनेत मिळालेली मदत/अनुदान/कर्ज.

| अ. क्र. | योजनेचे सविस्तर नांव | मदत | अनुदान | कर्ज | मिळालेली मदत | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वर्ष | | वर्ष | | वर्ष | |
| | | | | | रोख | इतर पध्दत व संख्या द्या] | रोखा | इतर पध्दत वर्णन द्या] | रोखा | इतर पध्दत वर्णन करा. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |

२६. अ] योजनेत नमूद केल्याप्रमाणे रक्कम/ रोपे/मार्गदर्शन तुम्हाला मिळाले का ?

होय/नाही

१] वेळेवर

२] चांगल्या स्थितीत

३] बरोबर

ब] बाब "अ" मध्ये उत्तर नकारार्थी असल्यास त्याची कारणे.

१] ........................

२] ........................

३] ........................

संकेतांक

२७. लावलेल्या झाडांची सद्यस्थिती [उदा. जिवंत झाडे, फळे लागलेली झाडे, कलमे/रोपे इत्यादी] [ ]

२८. वरील योजनेबाबत प्रात्यक्षिक/ मार्गदर्शन/प्रशिक्षण मिळाले का ? होय/नाही [ ]

असल्यास कोणाकडून.

अ] योजना राबविणा-या अधिका-यां- शी तुमचा संपर्क आहे काय ? होय/नाही [ ]

तुमच्या काही तांत्रिक अडचणी असल्यास तुम्ही त्या मांडल्या आहेत का ? असल्यास कोणत्या ? [ ]

२९. तुम्ही मार्गदर्शन/प्रशिक्षणाचा कसा उपयोग करून घेतला. [ ]

३०. तुम्हाला प्रशिक्षण/मार्गदर्शनाबाबत काही बदल सुचवासा वाटतो का ? हया बाबत तुमच्या काही सूचना आहेत का ? [ ]

३१. मिळालेल्या मदतीची/अनुदानाची/ कर्जाची सध्याची स्थिती. [ ]

- ९ -

<u>परिशिष्ट नं. ७</u>

<u>फलोद्यान योजना अंमलबजावणीबाबत माहिती.</u> संकेतांक

| | | | |
|---|---|---|---|
| ३२. | कलमे/रोपे भरपूर मिळाली का ? | होय/नाही | [ ] |
| ३३. | कोणाकडून रोपे/कलमे मिळाली ? | | [ ] |
| ३४. | किती अंतरावरून मिळाली ? | | [ ] |
| ३५. | रोपे/कलमे चांगली होती का ? | होय/नाही | [ ] |
| ३६. | रोपे/कलमे चांगली नसताना वापरली का ? | होय/नाही | [ ] |
| ३७. | फळांचे उत्पन्न सुरु झाले का ? | होय/नाही | [ ] |
| ३८. | नसल्यास किती वर्षांनी सुरु होईल. | | [ ] |
| ३९. | योजनेचे खर्च कसा भागविला | | [ ] |
| ४०. | आंतरपिके तुम्ही काढता का ? | होय/नाही | [ ] |
| ४१. | आंतरपिकांपासून किती उत्पन्न मिळते ? | | [ ] |
| ४२. | आंतरपिकांसाठी किती खर्च येतो ? | | [ ] |
| ४३. | मिळालेल्या कर्जाची परतफेड केली कां ? | होय/नाही | [ ] |
| ४४. | नसल्यास केव्हापासून परतफेड सुरु होणार. | | [ ] |
| ४५. | तुम्हाला फलोद्यानाच्या आणखी कोणत्या योजना राबविता येतील | १]<br>२] | |
| ४६. | तुम्हाला ही योजना फायदेशीर आहे कां ?<br>असल्यास कशी ? | होय/नाही<br>........................ | [ ] |
| ४७. | फायदेशीर नसल्यास फायदेशीर होण्यास कोणते उपाय योजावेत ? | | |
| ४८. | सर्वेक्षण अधिकाऱ्याचे मत :<br>अ] लाभार्थींनि खरोखर फायदा घेतला का ?<br>ब] नसल्यास का फायदा घेतला नाही ? | | |

सर्वेक्षणाची तारीख

सही ........................

हुद्दा ........................

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
२८, राणीचा बाग, पुणे-४११००१.

महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येत असलेल्या फलोद्यान विकासाबाबत मूल्यमापन पहाणी.

[१९८८]

प्रपत्र क्र. [२]

[योजना राबविणा-या यंत्रणेसाठी]

चौक क्र. [१]

सर्वसाधारण माहिती

१. जिल्हा .................... २. तालुका ....................

३. योजना राबविणा-याचे नांव ..............................

हुद्दा ..............................

४. राबविणा-याचे क्षेत्र ..............................

५. या योजनेत तुमचा सहभाग कसा आहे ?

चौक क्र. [२]

६. या योजनेबाबत माहिती

| अ. क्र. | योजनेचे सविस्तर नांव | सन-१९- | | १९- | | १९- | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

७. योजना राबविण्यात येणाऱ्या अडचणी. ________________________________

________________________________

________________________________

८. योजना यशस्वीपणे राबविली जाते काय ? होय/नाही

९. जात नसल्यास ती यशस्वी राबविण्यासाठी कोणते उपाय योजावेत.
१. ________________________
२. ________________________
३. ________________________

१०. योजनेतील गुणदोष
१. ________________________
२. ________________________
३. ________________________

११. आदिवासींचा योजनेमध्ये सहभाग होतो काय ? होय/नाही

१२. सहभाग होत नसेल तर त्यावर कोणते उपाय योजावेत. ________________________

________________________

________________________

________________________

१३. नव्याने कोणत्या योजना राबविता येतील.
१. ________________________
२. ________________________
३. ________________________
४. ________________________

१४. योजनेमुळे दारिद्र्य रेषेच्यावर आलेल्या कुटुंबांची संख्या. :

१५. शेरा

सर्वेक्षण तारीख :

सही.

८. आदिवासी शेतकरी फलोत्पादनाच्या योजना राबविण्यात उत्सुक आहेत. परंतु फलोत्पादन विकास खात्याचे कर्मचारी सर्व ठिकाणी जाऊ शकत नसल्याने कांही वेळा योजना राबविल्या जात नाही. आणखी असे निदर्शनास आले आहे की, बोरीला डोळा भरण्यासाठी आदिवासी बोरांच्या झाडांची छाटणी करुन ठेवतात. पण फलोद्यानाचे कर्मचारी वेळेवर तेथे न गेल्याने त्या झाडांना डोळे भरण्याचे काम करता आले नाही. त्याचप्रमाणे आंबा कलमे करणे, रोपांची लागवड करतांना तांत्रिक मार्गदर्शन केले जात नाही. परिणामत: आदिवासी शेतकरी सदर योजनेपासून वंचित राहतो. त्याला आर्थिक लाभास मुकावे लागते.

फळबागा लागवडीसंबंधात तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन करण्यासाठी तालुका पातळीवर फलोद्यान विभागाचे दोन किंवा तीन कर्मचारी देण्यात आले आहेत. परंतु त्यांचे तालुका पातळीवर कार्यालय नसल्याने त्यांची तात्पुरती सोय गटविकास अधिकारी पंचायत समिती यांचे कार्यालयात करण्यात आली आहे. परंतु त्यांचेवर गटविकास अधिकारी यांचे नियंत्रण नसते. सदर कर्मचारीवृंद तांत्रिक सल्ल्यासाठी वेळेवर शेतकऱ्यांना उपलब्ध असत नाही. आदिवासी शेतकऱ्याला बरेच हेलपाटे मारावे लागतात. परिणामत: योग्यवेळी तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन आदिवासी लाभधारकास उपलब्ध होऊ शकत नाही.

<u>फळबागांचे फायदेशीर स्वरुप</u> :

१. फलोद्यानामुळे शेतकऱ्यांना बारा महिने काम मिळते. फलोत्पादनास पुरक असे नवीन व्यवसाय धंदे गावांतून निघू शकतील. उदा. टोपल्या तयार करणे, करंडे तयार करणे, फळे काढण्यासाठी खुडया तयार करणे, इत्यादि उद्योगामुळे गावांतील बुरुड, लोहार व सुतार ह्या लोकांना गावांत काम मिळू शकेल.

२. निवडलेल्या लाभार्थींपैकी जवळ जवळ ७५ टक्के लाभार्थींना आर्थिक फायदा झालेला आहे. त्यामध्ये मुख्यत: भाजीपाला निविष्ठा वाटप ह्या योजनेचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. त्यानंतर बोर झाडांना डोळे भरण्याचा, इतर फळझाडे लागवड ह्या योजनेचे दृश्य स्वरूपातील फायदे मिळण्यास अद्याप कांही वर्षे लागणार आहेत.

३. फळझाडांना फळे लागून आर्थिक फायदा झालेल्या लाभार्थींची संख्या फक्त १५ असून तीची टक्केवारी फक्त १२ आहे. कांही लाभार्थींकडे फळझाडांची लागवड नुकतीच झाली आहे. त्यामुळे त्यांना फळे लागण्यास अवधी आहे. यथावकाश आर्थिक फायदा दृगोचर होईल.

.....